https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी  वर्ष - ५ वे  अंक -२४१ रविवार,दि.०४ मे २०२५  98 22 62 85 21  आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु  । पाने ४

Beed  Daily Marathi  Year-5th  Issue-241  Sunday, Dt.04 May 2025  98 22 62 85 21  RNI - MAHMAR/2020/79801  Price 3 Rs.  Pages 4

## लोकनेते सुं.सो.साखर कारखान्यात आग, ५० लाखांपेक्षा जास्त नुकसान

माजलगाव (प्रतिनिधी)तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या बगॅस व इतर साहित्याला शुक्रवारी दुपारी अचानक आग लागली.यात ५० लाख रुपयां पेक्षा जादा नुकसान झाल्याचे अंदाज आहे.

आगीचे कारण कळू शकले नसून आग आटोक्यात आणण्यासाठी

(उर्वरीत पान २ वर)

# सामाजिक न्याय विभाग बंद करा

## संजय शिरसाट यांची अजित पवार यांच्यावर सडकून टीका

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) - महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री आणि शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी आज अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील वित्त विभागावर त्यांच्या नकळत त्यांच्या विभागाचा निधी बेकायदेशीरपणे इतरत्र वळवल्याचा आरोप केलाय. राज्य सरकारने दिलेला निधी वेळोवेळी इतरत्र वळवण्याऐवजी सामाजिक न्याय विभागच बंद केलेला बरा असं मंत्री शिरसाट उपरोधानं म्हणालेत.

शिरसाट यांच्या अशा संतप्त प्रतिक्रियेमुळे भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमधील एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष यांच्यातील तणाव वाढू शकतो. त्यांनी (अर्थसंकल्पादरम्यान) मला अंधारात ठेवून माझ्या विभागातून ७,००० कोटी रुपये वळवले होते. जर सरकारला सामाजिक न्याय विभाग चालू द्यायचा नसेल किंवा त्यांना पैसे खर्च करायचे नसतील, तर त्यांनी हा विभाग बंद करावा. याला अन्याय म्हणा किंवा काहीही म्हणा. मला निथी वळवण्यामागील कारण माहीत नाही, असं शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांना सांगितलं.

सामाजिक न्याय विभागाच्या वाटपातून ४१३.३० कोटी रुपये वळवल्याच्या वृत्तावर शिरसाट संतापले. आमदार शिरसाट म्हणाले की, ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हा मुद्दा उपस्थित करतील. निधी वळवणे कायदेशीर नाही. वित्त विभागाचा हा उद्धटपणा चुकीचा आहे. त्यांची कृती चुकीची आहे. मी त्याचा निषेध करतो, असं ते पुढे म्हणाले. वित्त विभागावर जोरदार हल्ला चढवत शिरसाट म्हणाले की, ही सहनशीलतेची मर्यादा आहे.

ते सर्व निधी एकदाच का कमी करत नाहीत? विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि वसतिगृहांची गरज का आहे? मागासवर्गीयांना मुख्य प्रवाहात आणण्याची गरज काय आहे? सामाजिक न्याय विभाग अस्तित्वात नसेल तर ते ठीक होईल, असं त्यांनी उपहासात्मकपणे सांगितलं. उल्लेखनीय म्हणजे, शिरसाट यांनी मार्चमध्ये असा आरोप केला होता की अर्थसंकल्पात सामाजिक





न्याय विभागाला देण्यात येणाऱ्या निधीत ७,००० कोटी रुपयांची कपात करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही अशाप्रकारे निधीच्या वळवण्याचा प्रकार अधोरेखित केला होता. त्यांनी असा दावा केला की, सामाजिक न्याय विभागासाठी मंजूर झालेल्या ३,९६० कोटी रुपयांच्या निधीपैकी ४१४.३० कोटी रुपये राज्य सरकारने वळवले आहेत. दानवे यांनी असाही दावा केला की, महिलांसाठीच्या प्रमुख लाडकी बहीण योजनेचा मासिक हप्ता देण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून ३३५.७० कोटी रुपयांचा निधी वळवण्यात आला आहे. वाटप केलेला निधी अशा प्रकारे वळवता येत नाही, असं त्यांनी एक्स वर म्हटलय.

## ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतली स्व. बाबासाहेब आगेंच्या कुटुंबियांची भेट

प्रतिनिधी @ माजलगांव

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज किट्टी आडगाव येथे जाऊन स्व. बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. आगे परिवाराचे दु:ख हे माझे दु:ख आहे, एक चांगला कार्यकर्ता आपण गमावला आहे. आगे परिवाराला न्याय मिळवून देण्यासाठी गरज पडली तर सुप्रीम कोर्टापर्यंत लढा देऊ अशा शब्दांत धीर देत ना. पंकजाताईंनी आगे यांच्या आई, पत्नी व मुलीची जबाबदारी घेतली. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या मदतीचा धनादेश यावेळी आगे परिवाराला देण्यात आला.



आगे परिवाराचे दु:ख हे माझेही ; त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी गरज पडली तर सुप्रीम कोर्टापर्यंत लढू

भाजपचे जिल्हा विस्तारक स्व बाबासाहेब आगे यांची काही दिवसापूर्वी हत्या झाली होती. त्यांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबीयावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे, अजूनही या दु:खातून ते सावरले नाहीत. मध्यंतरी ना. पंकजाताई मुंडे बीड दौर्यावर आल्या होत्या, त्यावेळी त्यांनी या परिवाराचे दूरध्वनीवरून सांत्वन केले होते व पुढील दौऱ्यात येऊ असे

(उर्वरीत पान २ वर)

## पोखरी ( घाट) गावात रंगलेल्या निकाली कुस्त्यांच्या दंगलीने कुस्तीप्रेमींची मने जिंकली

प्रतिनिधी @ लिंबागणेश

बीड तालुक्यातील पोखरी ( घाट) गावात दि.०२. शुक्रवार रोजी निकाली कुस्त्यांची दंगल लोकसहभागातून बांधण्यात आलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणातील मैदानात कुस्त्यांची दंगल पार पडली. बीडचे खा.बजरंग बप्पा सोनावणे, बीड जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गट राजेंद्र मस्के, बंकटस्वामी मठाधिपती ह.भ.प. लक्ष्मण मेंगडे महाराज,बेलेश्वर संस्थान मठाधिपती शांती ब्रम्ह तुकाराम महाराज,चोरमले महाराज यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कुस्ती दंगलीस प्रारंभ झाला.प्रारंभी लहान मुलांच्या व कुस्तीपटुंच्या कुस्त्या झाल्या.मात्र त्यानंतर पुणे,कोल्हापूर,अकलुज,अहिल्यानगर, धाराशिव, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याच्या विविध भागातील कुस्तीपटुंच्या आखाड्यात कुस्त्या झाल्या. १००० रूपये पासुन ३१,००० रूपयापर्यंत बक्षिसांची रक्कम ठेवण्यात आली होती. अंतिम लढत गणेश काळे मौलाली तालिम




संघ भुम आणि कृष्णा पवार यांच्यात होऊन गणेश काळे विजयी झाले. त्यांचा स्मृती चिन्ह आणि

(उर्वरीत पान २ वर)

## जातीयवादी वसंत खेडकरची दलित महिलेस बेदम मारहाण

### घटना सीसीटीव्ही मध्ये कैद

प्रतिनिधी @ बीड

एका दलित महिलेस घरासमोर राहणाऱ्या रिटायर्ड फौजीने बेदम मारहाण केली असून उपचारासाठी त्या महिलेस जिल्हा शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सविस्तर वृत्तांत असा कि, महात्मा फुलेनगर, धानोरा रोड, बीड. या ठिकानी शिक्षक असलेले अंकुश कोरडे व रिटायर्ड फौजी वसंत खेडकर हे समोरासमोर राहतात, गत दोन वर्षापासून किरकोळ कारणांवरून वसंत खेडकर हे कोरडे दाम्पत्यास जानिवपूर्वक त्रास देत आहेत, बुधवार दिनांक ३० एप्रील रोजी असेच कुठलेतरी कारण काढून खेडकर हे कोरडे यांच्या मुलांना रागावले व धमकावून प्रखरतेने जातीचा उल्लेख करून शिवीगाळ केली. त्यावरून कोरडे यांच्या मुलांनी आईस घरात



जाऊन सांगितले की बाहेर समोरचे काका ओरडत आहेत. त्याबाबत घराबाहेर येवून दीक्षा अंकुश कोरडे यांनी खेडकर यांना विचारताच मी तुझ्या मुलांच्या अंगावर गाडी घालीन अशी धमकी देवून त्यांनी दिक्षा कोरडे यांचे केस पकडून त्यांचे डोके यांनी त्यांच्या गेटवर आपटले तेव्हा ते मोठ्याने ओरडून म्हणत होते तुम्ही महाराचे लोक खुप माजलात तुमचा माज उतरायला मला वेळ लागणार नाही. मी आर्मीत नोकरी केली आहे तुम्हा महारगाडयांना संपवायला मला वेळ लागणार नाही, तुम्ही आमची बराबरी करता काय अस बरच काही ते बोलत होते त्यावेळी त्यांची पत्नी पुष्पा खेडकर हिनेसुद्धा दिक्षा कोरडे यांना मारहाण केली आणि वसंत खेडकर यांनी दिक्षा यांना लज्जा वाटेल अशा ठिकानी त्यांना स्पर्श करून त्यांचा जानिवपुर्वक विनयभंग केला. यावेळी कोरडे यांची लहान मुले आईची सुटका करण्याबाबत केविलवाण्या आवाजाने ओरडत होती, या नराधमाने या बालकांनाही उचलून फेकून कोरडे यांच्या मुलीला मारहाण केली. हा सर्व प्रकार घरी घडत असताना अंकुश कोरडे हे घरी नव्हते.

शिवाजी नगर पोलीस ठाण्यात विनयभंगासह भारतीय न्याय संहितेच्या अनेक कलमाने आणि क्ट्रॉसिटी अधिनियमाने वसंत खेडकर व इतरा विरुद्ध गुन्हा दाखल झाला असून पोलीस तपास करीत आहेत. काल रुग्णालयात जावून अनेक पक्ष संघटनांच्या नेत्यांनी जखमी दिक्षा अंकुश कोरडे यांची भेट घेवून त्यांना धिर दिला आहे. आणि घटणेबाबत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. सदरील गुन्हेगारांना लवकरात लवकर अटक करून अन्यायग्रस्त महिलास न्याय द्यावा अशी सर्व स्तरातून मागणी होत आहे.

## हिंदू मुस्लिम ओबीसी, भटके-विमुक्त संघर्ष समिती स्थापन

प्रतिनिधी @ बीड

आज शनिवार दि.३/५/२०२५ रोजी शासकीय विश्रामगृहात हिंदू मुस्लिम समाजातील ओबीसी,भटक्या-विमुक्त जाती सर्व ओ.बी.सी. जमातीतील प्रमुख पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली.

यावेळी केंद्र सरकारने देशातील सर्व धर्मांची जातिनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतलाय या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील हिंदू मुस्लिम ओबीसी भटके-विमुक्त समुहातील सर्वच विविध समाजातील प्रमुख पदाधिकारी यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्या असलेले



### जिल्हाध्यक्षपदी डॉ.लक्ष्मण जाधव तर शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांची निवड

पश्न जसे की ओबीसी,भटके-विमुक्त जाती जमातींचे पदोन्नतीतील आरक्षण, क्रीमिलिअरची अट रद्द करणं,या समुहातील प्रत्येक जातींचे आर्थिक महामंडळ स्थापन करण्यात यावे, राज्यघटनेने दिलेल्या अधिकारानुसार आयोग,समित्या,कमिटयांच्या शिफारशी

(उर्वरीत पान २ वर)

## जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे, यश वंजारे, काळजीवाहक छाया सरोदे यांचा पद्मपाणी पुरस्काराने आज होणार सन्मान

प्रतिनिधी @ बीड

मागील सतरा वर्षापासून संविधान दिनाच्या अनुषंगाने विविध क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या व्यक्तीं, संस्थाना पद्मपाणी प्रतिष्ठान व सा. जनसुर्य यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मपाणि राष्ट्रीय, राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. हा नामांकित पुरस्कार आदर्श शिक्षक, उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी, उत्कृष्ट सामाजिक कार्य, जीवन गौरव, आदर्श शाळा, उत्कृष्ट उद्योजक, उत्कृष्ट साहित्यिक यांना त्यांच्या कार्याची ईतरांना ओळख व्हावी आणी प्रेरणादायी कार्यासाठी हा पुरस्कार दिला जातो.

बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील रंजल्या गांजल्याच्या अखंड सेवेबद्दल आज हा सामाजिक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.बीड येथील अनाथ, विकलांग, वृद्ध, बेवारसपणे रस्त्याच्या कडेला आढळणाऱ्या वृद्ध निराधार व्यक्तींना जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात आणून त्यांची आरोग्य स्वच्छता, निवासी अवस्था, दवाखाना, खानपान आदी व्यवस्था मागील अनेक वर्षांपासून अहोरात्र सेवा करणाऱ्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्राने बीड जिल्ह्यात लौकिक प्राप्त केला असून निराधारांचा आधार ठरलेल्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे, यश वंजारे, काळजीवाहक छाया सरोदे यांना जिल्हा परिषदेचे मुख्य अधिकारी आदित्य जीवने, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, संपादक विजयराज बंब, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सदाशिव राऊत, श्रीमती श्रावस्ती मेश्राम, तहसीलदार बीड चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक नानाभाऊ हजारे, गटशिक्षणाधिकारी वडवणी बाबासाहेब उजगरे, प्रा. गौतम गायकवाड, डॉ. विठ्ठल जाधव, संतोष गायकवाड , जिल्हा ट्रॅफिक पोलीस अधीक्षक

(उर्वरीत पान २ वर)




शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# पाकला धडा शिकवणार, कूटनीती की रणनीती

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला, तर अनेकजण गंभीर जखमी झाले. या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. हा हल्ला पाकिस्तानने त्यांच्या दहशतवाद्यांकडून करवून घेतला, याचे पुरावे भारतीय सुरक्षा यंत्रणांना पहलगाम परिसरामध्ये उपलब्ध झाले. पाकिस्तान या प्रकरणी हात झटकत असला तरी भारतात होत असलेले दहशतवादी हल्ले हे पाकपुरस्कृतच असल्याचे जगजाहीर आहे. पहलगाममध्ये पर्यटकांवर हल्ला झाल्याने जम्मू-काश्मीरच्या पर्यटनांवर परिणाम झाला आहे. नवविवाहित जोडपी हनीमूनसाठी जम्मू-काश्मीरमध्ये आलेली असताना, सुखी संसाराची स्वप्ने रंगवत असतानाच हा दहशतवादी हल्ला झाला आणि अनेकांच्या नवसंसाराची राखरांगोळी झाली. पहलगाममध्ये हल्ला होताच भारताच्या कॅबिनेट सुरक्षा समितीने काही निर्णय घेतले. त्यात १९६०चा सिंधू नदीच्या पाणी वाटपाचा करार तत्काळ प्रभावाने स्थगित करण्यात येईल, जोपर्यंत पाकिस्तान सीमेपलीकडच्या दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवत नाही तोपर्यंत ही स्थगिती लागू राहील.

अटारी बॉर्डर तत्काळ प्रभावाने बंद करण्यात येईल. ज्या नागरिकांनी वैध कागदपत्रांच्या आधारे सीमा ओलांडली आहे त्या पाकिस्तानी नागरिकांना १ मे २०२५ पर्यंत यामार्गाने भारत सोडण्याचे आदेश. पाकिस्तानी नागरिकांना सार्क व्हिसा सूट योजना या योजनेखाली भारतात प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नाही. याआधी पाकिस्तानी नागरिकांना जारी केलेले कोणतेही व्हिसा रद्द मानले जातील. सध्या सार्क व्हिसा योजनेअंतर्गत भारतात असलेल्या कोणत्याही पाकिस्तानी नागरिकाला भारत सोडण्यासाठी ४८ तासांची मुदत देण्यात आली. नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील संरक्षण/लष्करी, नौदल आणि हवाई सल्लागारांना 'पर्सना नॉन ग्राटा' घोषित करण्यात आले. त्यांना भारत सोडण्यासाठी एक आठवड्याची मुदत देण्यात आली. इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयातून भारताच्या संरक्षण/नौदल/हवाई सल्लागारांना परत बोलावण्यात आले. संबंधित उच्चायोगांमधील ही पदे रद्द मानली जातात. दोन्ही उच्चायोगांमधून सेवा सल्लागारांचे पाच सहाय्यक कर्मचारी देखील काढून घेतले जातील. १ मे २०२५पर्यंत आणखी कपात करून उच्चायुक्तालयात काम करणाऱ्यांची संख्या ५५ वरून ३० पर्यंत कमी केली जाईल. पाकनेही त्यास तत्काळ प्रत्युत्तर देत तशाच स्वरुपाचे निर्णय घेतले. फक्त त्यात भारताशी तसेच भारताच्या माध्यमातून इतर देशांशी होणारा सर्व व्यापार त्वरित स्थगित केले, हा अतिरिक्त निर्णय घेतला. पहलगाम घटनेनंतर दोन्ही देशांवर युद्धाचे सावट आहे. पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह सातत्याने बैठका घेत आहेत.



येळंबघाट - वडमावली विद्या प्रसारक मंडळाचे श्याम विद्यालय, श्याम कनिष्ठ महाविद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय दहिफळ वडमाऊली तालुका केज येथे महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर एकतेचे अनोखे दर्शन सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घडवले. (छाया तात्यासाहेब डोईफोडे)

# मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या कार्यकाळात नगरपालिकेत अंधारच अंधार !

### पाण्यासाठी शहरातील नागरिकांना भटकंती करण्याची वेळ - वर्षाताई जगदाळे

प्रतिनिधी @ बीड

शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवण्याची जबाबदारी असणाऱ्या बीड नगरपालिकेच्या मुख्य अधिकारी नेता अंधारे यांनी तुघलकी कारभार सुरू केला आहे का? शहरातील नागरिकांना २५ दिवसाला पिण्याचे पाणी येत नसल्याने याचा जाब विचारण्यासाठी नगरपालिकेत गेलेल्या मनसेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांना आपली जबाबदारी पाण्याची नसल्याचे सांगत हात वर करणाऱ्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांची तात्काळ बीड मधून निलंबित करत हकलपट्टी करण्याची मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करणार असल्याचे वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले असून बीड नगरपालिकेचा कारभार नीता अंधारे यांच्या कार्यकाळात दयनीय झाला आहे. शहरात साचलेले कचऱ्याचे ढीगारे पसरलेली रोगराई रात्रीच्या वेळी मुख्य ठिकाणी असलेले पथदिवे बंद यासह शहरात मोकाट जनावरांचा वावर तुंबलेल्या नाल्या यासह शहरातील नागरिकांना पिण्याचे मुबलक पाणी मिळत नसल्याने शहरात पाणी बानी



असल्याचे चित्र दिसत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्या सह मनसेचे शिष्टमंडळ कधीही हजर नसलेल्या नीता अंधारे यांच्या भेटीसाठी गेले असता तब्बल ११४ कोटी रुपयांची जलजीवन योजना जल जीवन विभागाकडे देण्यात आली असल्याचे म्हणत आपली जबाबदारी फक्त पाणी सोडण्याची आहे. या पलीकडे आम्ही काही करू शकत नाही पाणी न आल्यास आम्ही काहीच करू शकत नसल्याचे सांगत तुम्हाला लेखी स्वरूपात देते असल्याची उर्मट भाषा मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी वापरली. नीता अंधारे यांच्या विरोधात अनेक तक्रारी झाल्या आहेत मात्र मुख्याधिकाऱ्यांचे लाड कशामुळे पुरवले जात आहेत निष्क्रिय व भ्रष्टाचारी असलेल्या नीता अंधेरीची बदली करण्यासाठी नगर विकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबई येथे जाऊन भेट घेणार असल्याचे मनसेच्या वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे. बीड नगरपालिकेला आलेला कर व नळपट्टी घरपट्टी बांधकाम बनवण्यासाठी लागणारे पैसे हे कुठे जातात. दहा कोटी रुपयांचे टेंडर जिल्हाधिकारी रद्द केले यामागे नीता अंधारे ची बुद्धी होती आता पाण्यासाठी लोकांना त्रास देणाऱ्या या मुख्यअधिकारी नीता अंधारे यांना बीड शहरातून निलंबित करत अकलपट्टी करण्याची मागणी वर्षाताई जगदाळे यांनी केली असून. मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या विरोधात नगरपालिकेत पुन्हा बोंबाबोंब आंदोलन करणार असल्याचे वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे. वर्षाताई जगदाळे यांच्यासह महिला जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे तथा शहराध्यक्ष अमरजान पठाण आदी मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सर्जरी विभागाचे राज्यातील सर्वात युवा प्राध्यापक म्हणून डॉ.नितीन चाटे यांची निवड



प्रतिनिधी । अंबाजोगाई

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालययेथील सर्जरी विभागाचे डॉ. नितीन चाटे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झाली.स्वाराती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील गेली आठ वर्षांपासून सहयोगी प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून अतिरिक्त कार्यभार सांभाळत महात्मा जोतिबा फुले योजनेच्या भरीव कामातून राज्यभर आपली ओळख निर्माण केलेल्या डॉ.नितीन चाटे यांची नुकतीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राध्यापक पदी निवड करण्यात आली असून पदस्थापना स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात झाली आहे.

पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणासाठी विद्यार्थी म्हणून अंबाजोगाई येथे आलेल्या डॉ नितीन चाटे यांनी विद्यार्थी चळवळीत योगदान देत मार्ड संघटनेचे राज्य सचिव म्हणून काम केलेले आहे.

विभागप्रमुख म्हणून गत आठ वर्षे कार्यरत असताना पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागांमध्ये चाळीस वर्षानंतर वाढ करण्यात आली,

बीड जिल्ह्यातील पहिली ओपन हार्ट सर्जरी करून स्वाराती रुग्णालयाची मान उंचावली आहे.स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये,महात्मा फुले योजनेचे राज्य स्तरीय अभियान राबवून गेली सहा वर्षापासून अविरत काम करून प्रथम क्रमांकावर येण्याचा मान त्यांनी मिळवून दिला आहे या योजनेमधून आजपर्यंत हजारो रुग्णांना फायदा झालेला आहे.

# बाजार समिती कार्यालयात आमदार सोळंके यांच्या हस्ते ध्वजारोहण



प्रतिनिधी @ माजलगांव

उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवा मोंढा फुले पिंपळगाव येथे आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्त१ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे सभापती जयदत्त(अण्णा) नरवडे,उपसभापती श्रीहरी (नाना)मोरे,सचिव हरिभाऊ सवणे,संचालक तथा सोळंके कारखान्याचे अध्यक्ष वीरेंद्र दादा सोळंके,माजी सभापती संभाजी शेजुळ,जेष्ठ नेते अच्युत लाटे,संचालक दत्तात्रय डाके,संजय कचरे,आबाजी भोसले,भागवत शेजुळ, अमोल जाधव,श्री.नंदकिशोर सजगणे,डॉ.उद्धव नाईकनवरे,भगवान आगे, प्रभाकर होके पाटील, आसाराम घायतिडक,कादिर पठाण यांचे सह सर्व आडते, व्यापारी,मापाडी,हमाल बांधव यांचे सह अधिकारी,कर्मचारी, वृंद उपस्थित होते.यावेळी सभापती जयदत्त नरवडे यांचे समायोजित भाषण झाले.

# सारथी संस्थेच्या थकीत फेलोशिपसाठी २०२२ च्या संशोधक विद्यार्थ्यांनी दिले आ. सुरेश धस यांना निवेदन

प्रतिनिधी @ बीड

एकीकडे सारथीच्या १७ विद्यार्थ्यांनी यूपीएससी परीक्षेत यश मिळवल्या मुळे सारथीचे कौतुक होत आहे.तर दुसरीकडे सारथीच्या उडचछठक्र -२०२२ च्या संशोधक विद्यार्थ्यांना जुलै २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीतील अधी छात्रवृत्ति म्हणजेच फेलोशिप अद्याप ही मिळालेली नाही.तसेच एक वर्षाचा जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ घरभाडे भत्ता (क्ठ-) व अकस्मात निधी (उेपींशसशपलू) अजूनही मिळालेला नाही.त्यामुळे सध्या २०२२ च्या बॅचचे सर्व पीएचडी चे सर्व मराठा सारथी संशोधक विद्यार्थी प्रचंड अडचणीत सापडले आहेत.एकीकडे केंद्र तसेच राज्य सरकार सर्व समाजामधील संशोधक विद्यार्थ्यांमध्ये समानतेचे धोरण आणण्याचा प्रयत्न करतो असे म्हणता आणि दुसरीकडेसरकार बार्टी आणि महाज्योती च्या विद्यार्थ्यांना तात्काळ फेलोशिप मिळवून देते पण जेव्हा मराठा समाजासाठी नेहमी हेच सरकार सापत्न वागणूक का देते? सारथीने तसेच सरकारने सर्व विद्यार्थ्यांना समान पातळीवर न्याय द्यावा अशी विनवणी नेहमी सारथी संशोधक हेविद्यार्थी करत आहेत

मराठा,कुणबी संशोधक विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात टाकणाऱ्या सरकारला आज जाब विचारण्याची गरज आहे सारथीच्या योजनांच्या माध्यमातून उच्चशिक्षण आणि संशोधनाला चालना देण्याचा दावा करणाऱ्या सरकारने या योजनांची अंमल बजावणी का नीट केलेली नाही.मागील एक वर्षापासून फेलोशिप मिळत नाही म्हणून विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे अशी तक्रारअनेक विद्यार्थी करत आहेत. पुस्तके,साहित्य, बाहेरगावी राहण्याचा आणि प्रवासाचा खर्च विद्यार्थ्यांना स्वतःच्या खिशातून करावा लागत आहे.फेलोशिपसाठी अट आहे की नोकरी करायची नाही,मग संशोधनासाठी पैसेकोण देणार? परदेशात उच्च शिक्षणासाठी फेलोशिप मिळण्यास दहा महिन्यां हून अधिक विलंब झाला यामुळे अनेकांनी आपले शिक्षण पुढे ढकलले किंवा सोडून दिले याला जबाबदार कोण? असाप्रश्न सकल मराठा संशोधकविद्यार्थी विचारत



आहेत.या समस्येकडे लक्ष वेधण्या साठी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन भाजपा आमदार सुरेश अण्णा धस यांची भेट घेतली आणि निवेदन दिले.यानिवेदना ची तातडीने दखल घेत हा विषय आ.सुरेश धस यांनी मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे मांडणार असल्याचा यावेळी शब्द दिला.प्रसंगीसारथी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.कोल्हे साहेब यांच्याशी चर्चा करून लवकरातलवकर बैठक आयोजित करण्याचे आश्वासन देखील सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी दिले आहे.या बैठकीत प्रलंबित फेलोशिप निधीतातडीने उपलब्ध करून देण्या साठी योग्य पावले उचलली जातील. विद्यार्थ्यांच्या कार्यात कोणताही अडथळा येऊ नये,यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यासाठी आ.सुरेश धस हे कटिबद्धअसणार आहेत असा शब्द निवेदन देणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला.

## पान १ वरून...

**लोकनेते सुं.सो.साखर....**

दोन तासांपेक्षा जास्त अवधी लागला,कारखान्याच्या बगैस कन्व्हेअरला शुक्रवारी बारा वाजेच्या सुमारास अचानक आग लागली.काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले. यात बगॅस जळाला असून,तेथे असलेलेइतर साहित्यही खाक झाले. तेलगाव,माजलगाव,वडवणी,धारूर येथील अग्निशमन बंबाच्या परिश्रमानंतर दोन तासांनी आग आटोक्यात आली. कारखान्याच्या प्राथमिक अंदाजानुसार १०० मे.ट.बगॅस,रबर बेल्ट सीसी ४,बीसी ३,बीसी-८ व ट्रॅश कटर,इलेक्ट्रिक मोटार,केबल,अँडलर,इम आदी साहित्य जळाले असल्याचे कारखान्याच्या वतीने सांगण्यात आले.त्यामुळे आगीत कारखान्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, कारण अद्याप समजले नसल्याचे सांगण्यात आले.कार्यालयाने माजलगाव,वडवणी व धारूर येथील नगर पालिकेच्या अग्नीशमन बंबास ही पाचारण केले.या तिन्ही ठिकाणाहून कांही वेळात कारखाना येथे अग्नीशमन बंब आले. त्यांनी शर्तीचे प्रयत्न करत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.चार अग्नीशमन बंबाच्या सहाय्याने दोन तासात आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न सफल या अग्नी शामक दलाने व कर्मचाऱ्याने केला आहे.

**पोखरी ( घाट) गावात...**

३१,००० रूपये रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला.द्वितीय बक्षीस २५,००० रूपये बाळु बहिरवाल पाटोदा तालीम आणि तृतीय बक्षीस २१,००० रूपये मयुर कणसे आष्टी आणि संदिप लटके जामखेड या कुस्तीपटुंना विभागुन देण्यात आले. यावेळी पंचकमेटी म्हणून बाळासाहेब लेणे पुणे, गहिनीनाथ सिरसाट अहिल्यानगर, बाळासाहेब आवारे पाटोदा, दादासाहेब खिल्लारे आणि पोखरी (घाट) सरपंच बिभीषण मुळीक यांची उपस्थिती होती.कुस्ती बघण्यासाठी लिंबागणेश पंचक्रोशीतील कुस्तीप्रेमींनी तसेच लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. यावेळी महिलांची सुद्धा मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. दादासाहेब खिल्लारे यांनी कुस्त्यांच्या दंगलीसाठी केलेले चोख नियोजन, परंडा येथील लक्ष्मण जाधव यांच्या हलगीच्या तालावर पाहुण्यांचे फेटा बांधून स्वागत,कुस्तीपटुंची ओळख, कुस्तीचे मोसीन अत्तार बार्शी यांची धावती कॉमेंट्री,कुस्तीपटुंना आखाडा जाम होऊन दुखापत होऊ नये यासाठी अधुनमधून रोटर फिरवून कुस्तीचे मैदान भुसभुशीत करणे आदी गोष्टी नजरेत भरणा-या होत्या याचा प्रेक्षकांनी मनमुराद आनंद घेतला. लोकसहभागातून बांधण्यात आलेल्या शाळेप्रमाणेच ग्रामीण भागातील युवावर्ग व्यसनमुक्त होऊन मैदानी खेळाकडे वळावा, ग्रामीण भागातील कुस्तीपटुंना प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षी कुस्त्यांच्या दंगलीचे आयोजन करण्यात येणार असुन उत्तरोत्तर भव्यदिव्य स्वरूपात कुस्त्यांच्या दंगली भरवण्यात येणार असल्याचे आयोजक दादासाहेब खिल्लारे यांनी सांगितले.

**ना. पंकजाताई मुंडे यांनी....**

सांगितले होते. त्यानुसार आज त्यांनी किट्टी आडगाव येथे जाऊन आगे यांच्या आई, पत्नी व त्यांच्या चिमुकलीची भेट घेतली व सांत्वन केले.

आगे यांची मी मोठी बहिण, त्यांचं दुःख मलाही

स्व. बाबासाहेब आगे एक धडाडीचा कार्यकर्ता होता, त्यांच्या जाण्याने मलाही खूप दुःख झाले आहे, ते मला भावासारखे होते.त्यांचं कुटुंब स्वाभिमानी आहे, त्यांचा स्वाभिमान कायम ठेवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी जी काही मदत लागेल ती मी जरूर करेन. गरज पडली तर सुप्रीम कोर्टापर्यंत लढा देण्यासाठी प्रयत्न करू अशा शब्दांत धीर देत ना. पंकजाताईंनी आगे यांच्या पत्नी व मुलीची जबाबदारी स्वीकारत असल्याचे म्हटले.

ज्या गावात अडवले, तिथं ग्रामस्थांनी केलं नजरेनं स्वागत (चौकट)

लोकसभा निवडणुकीत प्रचाराच्या वेळी ना. पंकजाताईंना किट्टी आडगाव येथे अडवून गोंधळ घालण्याचा प्रयत्न झाला होता. आज त्याच गावात ना. पंकजाताई मुंडे गेल्या. त्या येणार असल्याने ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती, लोकं रस्त्याच्या दोन्ही बाजूने थांबले होते. कार्यकर्त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी आलेल्या ना. पंकजाताईंचे रस्त्यावर उभा असलेल्या ग्रामस्थांनी केवळ एका नजरेने

## पान १ वरून...

स्वागत केले, तशा छटा त्यांच्या चेहर्यावर यावेळी दिसून आल्या.

**हिंदू मुस्लिम ओबीसी,...**

लागू करण्यात याव्यात, केंद्र व राज्य सरकारच्या मागासवर्गीयांच्या साठीच्या शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करणं, प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह बांधणे,जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र यातील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात व इ.अश्या अनेक सामाजिक, शैक्षणिक अडिअडचणी विषयावर सखोल चर्चा करण्यात आली.यावेळी ओबीसी भटके-विमुक्त समुहातील अनेक जातींचे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी हिंदू मुस्लिम ओबीसी, भटके-विमुक्त संघर्ष समिती स्थापन करण्यात आली व त्या समितीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी डॉ.लक्ष्मण जाधव यांची तर खुर्शीद आलम यांची शहराध्यक्ष म्हणून सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच जिल्हा उपाध्यक्षपदी मनोज चव्हाण, कार्याध्यक्ष सय्यद फारुख मनियार, सहसचिव विजय गायकवाड, उपाध्यक्ष रफिक कुरेशी,संघटक शेख जाकेर, सहसंघटक अशोक दुधाड, उपाध्यक्ष शफिक तांबोळी, कोषाध्यक्ष वसंतजी अलकुटे तर मार्गदर्शक म्हणून सुभाषजी राऊत,प्रकाशजी कानगावकर,हाजी गुलाम जहांगीर आदीची निवडीची घोषणा करण्यात आली.यावेळी मातंग समाजातील नेते अनिलजी चांदणे,ओबीसीचे नेते प्रकाशजी कानगावकर,सन्नी चांदणे,हाशम बागवान, डॉ.अडागळे संतोष, कैकाडी समाजाचे युवक नेते विजयजी गायकवाड, अक्साद मंसुरी, वडार समाजाचे नेते वसंतजी अलकुंटे , मसणजोगी समाज अध्यक्ष हनुमंत मोरे,मांगगारुडी समाजाचे प्रभाकर हतागळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी माळी,साळी, छप्पर बंद,टकारी,वडार,मनियार, लोहार, मोमीन, कुरेशी,मातीवडार, तांबोळी, लोहार, मन्यार, शहा, कैकाडी, छप्परबंद, भावसार,खाटीक, मुस्लिम भंगी,ओतारी, रामोशी, बागवान, मुल्ला मुलानी, मांग गारुडी, मसणजोगी, फकिर, अत्तार, आदी समाजातील प्रमुखांची उपस्थित होती.

**जिव्हाळा बेघर निवारा ...**

सुभाष सानप, नवनाथ पोटभरे, अमोल जगताप, अशोक गायकवाड, विजयकुमार इंगळे, श्रीमती डॉ. सीमा ओस्तवाल, उत्तमराव पवार, श्रीमती अस्मिता जावळे, चंदन पठाण, सुभाष क्षीरसागर, गणेश वाघ, किसन तांगडे, हौसराव पवार, श्रीमती कविता गायकवाड, ॅड. दादासाहेब तांगडे, भारत कांबळे, देविदास निकाळजे, प्रमोद गायकवाड, प्रवीण तरकसे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दि. ०४ मे २०२५ रोजी सकाळी ठिक ११.३० वा. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे बहाल करण्यात येणार आहे. तरी या पुरस्कार सोहळ्यास बीडकर मित्र परिवार, स्नेहीजनांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. मागील आठ वर्षापासून अनाथ बेघर ज्यांना कोणीही नाही अशा लोकांची अहोरात्र सेवा, रोडच्या कडेला राहणारे, बस स्टँड वर झोपणारे, अनाथ बेघर यांना जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये आणून त्यांची दाढी, कटिंग करून त्यांचे समुपदेशन करून त्यांना माणूस बनवण्याचे कार्य केले जाते.

आज पर्यंत तीस लोकांच्या अंत्यसंस्कार, प्रत्येक वर्षी उन्हाळ्यात बीड शहराच्या जवळ असलेल्या अनेक गावांमध्ये प्रत्येक वर्षी सह्याद्री समाज मुंबई यांच्या माध्यमातून नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण या कामाची देखरेख करून अनेक शेतकऱ्यां साठी कार्य करण्यात आले आहे. रोडवर मनोरुग्ण लक्षण आसलेल्या अनेकांना उपचारासाठी प्रादेशिक रुग्णालय येरवडा येथे दाखल करून त्यांना प्रवाहात आणण्याचे कार्य जिव्हाळा परिवाराकडून करण्यात येत असून पद्मपाणी पुरस्काराने जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे कार्य अधिक गतिमान करण्यासाठी प्रेरणादायी ठरेल, असे जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे, संचालक अभिजित वैद्य, यश वंजारे, काळजीवाहक छाया सरोदे यांनी सांगितले. जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजित वैद्य, राजू वंजारे, यश वंजारे, काळजीवाहक छाया सरोदे यांना पद्मपाणी पुरस्कारा साठी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून अनेकांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एस.पी. वानखडे यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४०९/२०२५**
**हलीमाबी भ्र. नबी शेख व ईतर विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड. जी. पी. गवारे गेवराई)**

ज्याअर्थी मयत क. १ नामे हबीब जमालभाई शेख हे / हया दिनांक ०३/०१/२०२५ रोजी मौजे गुळज, ता. गेवराई, जि. बीड येथे झाले/ झाल्या आहेत. तसेच मयत क्र.२ नामे नबी हबीब शेख हे / हया दिनांक १३/०३/१९९६ रोजी मौजे मौजे पिंपळवाडी, ता. पैठण, जि. औरंगाबाद, येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क १. हलीमाबी भ्र. नबी शेख, वय- ७० वर्षे, धंदा- शेती व घरकाम, रा. गुळज, ता. गेवराई, जि. बीड, ह. मु. मुधळवाडी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, २. जावेद पि. नबी शेख, वय- ३७ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर, ३. अशपाक पि. नबी शेख, वय- ३५ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर, यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजा होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारा हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सुंदर मयत् हबीब जमालभाई शेख व मयत नबी हबीब शेख यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/०४/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

पुढील तारीख १२/०६/२०२५

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

## देवगांव येथेडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यातील देवगांव येथेदि.३० एप्रिल बुधवार रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरयांची १३४ वीजयंती मोठ्या थाटामाटात आणि उत्साहपुर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.केज तालुक्यातीलदेवगांव येथेविश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ व्याजयंती निमित्ताने दि.३० एप्रिल बुधवार रोजी सकाळी समाज मंदिर या ठिकाणी माजी ग्राम पंचायत सदस्य तथा पत्रकार महादेव गायकवाड यांच्या हस्ते पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.या नंतर महा मानव तथागत गौतम बुध्द व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन बुध्दवंदना घेण्यात आली.संध्याकाळी विश्वरत्नडॉ.बाबासाहेबआंबेडकरयांच्या प्रतिमेला उपस्थित महिलांनी पुष्पहार अर्पण करून या मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली.डॉ. बाबासाहेबआंबेडकरयांच्या प्रतिमेची वाजत गाजत गावातील मुख्य रस्त्यावरून मिरवणुक ढोलताशाच्या व तालावर तरूणांनी मनमुराद नाचण्याचा आनंद घेतला.मिरवणूक संपल्यानंतर समाज मंदिर या ठिकाणी बाहेरगावच्या प्रमुख मान्यवरांनी आपले विचार मांडले ही जयंती यशस्वी करण्यासाठी जयंतीचे अध्यक्ष विक्रम वाघमारे,उपाध्यक्ष साहील भैय्या गायकवाड,दैवान कांबळे,अर्जून गायकवाड,बंटी कांबळे, अरुण कांबळे, प्रज्वलीत भैय्या गायकवाड,दत्ता गायकवाड,अजय कांबळे,बापू गायकवाड,बाळू कांबळे,बंडू कांबळे, राणू कांबळे,बुध्दभूषण गायकवाड,कुमार गायकवाड,बापूराव वाघमारे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेऊन ही जयंती साजरी केली.यावेळी नांदूरघाट बीटचे जमादार राजू वाघमारे,राजू वंजारे, मस्के यांनी जयंतीला चोख पोलीस बदोबस्त दिला.तसेच पत्रकार अशोक नागरगोजे यांचीही उपस्थिती होती

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. ए. डी. कुलकर्णी यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३६७ / २०२५**
**अनुसयाबाई विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड. पटेकर पी.एम. गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे अर्जुन दगडु गायकवाड हे दिनांक १७/०२/२०२२ रोजी मौजे मिरगांव, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत अर्जदार १. अनुसयाबाई अर्जुन गायकवाड वय ६५ वर्षे, धंदा-शेती, रा. मिरगांव ता. गेवराई जि. बीड २. भिमराव अर्जुन गायकवाड वय ४८ वर्षे, धंदा-शेती, रा. मिरगांव ता. गेवराई जि. बीड ३. लक्ष्मी श्रीमंत येटाळे वय ४५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. गोरी ता. अंबड जि. जालना ४. सिताबाई श्रीमंत येटाळे वय ४२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. गोरी ता. अंबड जि. जालना यांना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत मयत नामे अर्जुन दगडु गायकवाड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १७/०४/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख १३/०६/२०२५

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. आर.आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई**
**गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज क.३७८/२०२५**
**विशाल व ईतर ४ वि. निरंक**
**(मार्फत ॲड. पी. एम. पटेकर, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे लहु पि.गोविंद आडे, रा. मौजे चाकु तांडा, पो.पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक २२/०२/२०२५ रोजी मौजे अर्धमसला, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले.

अर्जदार :- १)विशाल पि.लहु आडे, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, रा.चाकु तांडा, पो.पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड.२) ऋतुजा पि.लहु आडे, वय २० वर्षे, धंदा शिक्षण, रा.चाकु तांडा, पो.पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड.३) अनिता भ्र. लहु आडे, वय २९ वर्षे, धंदा शेती, रा.चाकु तांडा, पो.पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड.४) मुक्ताबाई भ्र.गोविंद आडे, वय ६२ वर्षे, धंदा शेती, रा.चाकु तांडा, पो.पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड.५) गोविंद पि.राम आडे, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा.चाकु तांडा, पो.पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे लहु पि.गोविंद आडे, रा. मौजे चाकु तांडा, पो. पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक १६/०४/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख १९/०६/२०२५

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा गेवराई, जि. बीड येथील २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एन. ए. रणदिवे यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३६६/२०२५**
**कमलबाई सिताराम पटेकर वि निरंक**
**(मार्फत - ॲड. पी. एम. पटेकर गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे सिताराम पि. शंकर पटेकर रा. पांचाळेश्वर, ता. गेवराई जि. बीड हे / ह्या दिनांक १३/०८/२०२१ रोजी मौजे पांचाळेश्वर ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क्र. १ कमलबाई भ्र. सिताराम पटेकर वय ६८ वर्षे, धंदा -शेती, रा.पांचाळेश्वर ता.गेवराई जि.बीड, २ पंचशिला भ्र. बाबासाहेब साळवे शेवगाव वय-४५ वर्षे, धंदा घरकाम रा. नागलवाडी, ता.शेवगांव जि. अहमदनगर, अर्जदार क. ३ निलावती भ्र. रावसाहेब कदम वय ४२ वर्षे,शेती रा. कोळवाडी, ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क. ४ सुरेखा भ्र. राजू तुरूकमारे वय-४० वर्षे, धंदा-घरकाम, रा. सावरगाव, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. ५ गौतम पि. सिताराम पटेकर वय -३८ वर्षे, धंदा शेती रा. पांचाळेश्वर, ता. गेवराई जि. बीड व अर्जदार क्र. ६ वनमाला भ्र. प्रकाश निकाळजे वय ३६ वर्षे, धंदा शेती रा. टाकळी अंबड, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या व गैरअर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे सिताराम पि. शंकर पटेकर रा. पांचाळेश्वर, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १५/०४/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख १६/०६/२०२५

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत १ मे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी @ केज

जिल्हा परिषद उच्च प्राथमिकशाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज या शाळेत १ मे २०२५ गुरुवार रोजी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला व त्यांना तरनळीशाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सहकार्य केले.यावेळी लव्हुरी केंद्राचे केंद्रप्रमुख राधाकिसन कांबळे साहेब हे उपस्थित होते.ध्वजारोहनानंतर राष्ट्रध्वजास सलामी देऊन राष्ट्रगीत,राज्य गीत,भारतीय संविधाना ची उद्देशिका तसेच श्री भारत बाबुराव हांगे सर यांनी बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा सर्व उपस्थितांकडुन वदवून घेतली.तसेचविद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.विद्यार्थ्यांना निकालपत्रक देण्यात आले तसेच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम हे ग्रामपंचायत तरनळी येथे ध्वजारोहणास उपस्थित होते.मुंबई प्रांत मध्ये असलेल्या व वारंवार भाषावार प्रांतरचना मागणी होत असल्याने मुंबईसह महाराष्ट्र राज्य व गुजरात अशी स्वतंत्र राज्य निर्मिती दि.१ मे १९६० रोजी झाली म्हणून १ मे हा दिवस महाराष्ट्र दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी कामगार दिन ही साजरा करण्यात येतो असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले. महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या हेसर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.यावेळी लव्हुरी केंद्राचे केंद्र प्रमुख श्री.राधाकिसन सोपानराव कांबळे यांनी या कार्यक्रमासउपस्थित राहुन मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.या शाळेतील आदर्श शिक्षिका श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम,श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम,श्री. बाळासाहेब भिल्लु राठोड सर,श्री.भारत बाबुराव हांगे सर,श्री. बाबासाहेब राजाराम मैंद सर,ट्रेनी शिक्षिका सीमा सुधीर मोहिते यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे,उपाध्यक्षा सीमा सुधीर मोहिते,सदस्य, शिवाजी मोहिते उप सरपंच,राधा आक्का खामकर,शिक्षणप्रेमी पालक विठ्ठल तात्या माने,नागरिक,अंगण वाडी ताई गवळण सरवदे काकु,मदतनीस कोमल दत्ता माने, आरोग्य आशाताई शोभाताई शिवप्रसाद माने,शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष सुशिल जमाले,दिनकर माने,तानाजी




मोहिते, पी.एम.पोषण शक्ती निर्माण योजनाचे कामगार श्री.गणेश काशिनाथ माने आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बाळासाहेब भिल्लु राठोड सर यांनी केले व श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम यांनी आभार मानले.



बीड : प्रशासकीय सेवेतील उत्तम कामगिरीबद्दल सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांना दिनांक ३ मे २०२५ रोजी वाहतूक शाखेमध्ये मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे दिसत आहेत.




## कामगार दिनाच्या निमित्ताने प्रधान तंत्रज्ञ विष्णु तेलंग यांचा उत्कृष्ट सेवेबद्दल सत्कार

प्रतिनिधी @ केज

कामगार दिनाच्या निमित्ताने प्रधान तंत्रज्ञ विष्णु भगवानराव तेलंग यांचा उत्कृष्ट सेवेबद्दल लातूर परिमंडळ येथे सत्कार करण्यात आला.या बाबत सविस्तर माहिती अशी की,केज ग्रामीण दोन चे प्रधान तंत्रज्ञ विष्णू तेलंग यांना उत्कृष्ट कामगार पुरस्कार देण्यात आला

आहे.दि.१ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनाच्या दिवशी हा पुरस्कार देण्यात आला आहे. झोनल ऑफिस लातूर येथे मुख्य अभियंता श्री.अरविंद बुलबुले साहेब यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला आहे.सलग ३३ वर्षे महावितरण मध्ये सेवा करून महा वितरण कंपनीने योग्य असा सन्मान देण्यात आलेला आहे याबाबत लातूर परिमंडळ मधील सर्व अधिकारी व कर्मचारी बांधवांनी तसेच मित्र मंडळी व आप्तेष्टांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### सराटेवडगांव येथील जानपीर देवस्थानच्या यात्रेत यशभैय्या आजबे व राजेंद्र धोंडे यांच्या हस्ते

# निखील धोंडे व शाईन शेख यांच्यात १५ हजार रु.दवंडीची कुस्ती संपन्न

प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथील जानपीर देवस्थान यात्रेनिमित्त दि. १ आणि २ मे असा दोन दिवस यात्रा उत्सव संपन्न झाला. जानपीर देवस्थानची यात्रेत यशभैय्या आजबे व राजेंद्र धोंडे यांच्या हस्ते निखील धोंडे व शाईन शेख यांच्यात १५ हजार रु. दवंडीची कुस्ती झाली. यावेळी महाराष्ट्र केसरी सईद चाऊस व बाबा अंधाळे, अमृत कर्डीले, ओम अंधाळे, पैलवान तोडकर आदी पैलवान उपस्थित होते. गुरुवारी रात्री छबीना मिरवणुक झाली. रात्री नामांकीत आर्केस्टा कार्यक्रम झाला. शोभेच्या दारुची अतिषबाजी करण्यात आली. सकाळी आर्केस्टाचा हजे-याचा कार्यक्रम झाला. मराठी परंपरा जोपासणारा गीतांचा मराठी, हिंदी लोकगीते, लावणी सोबत वेस्टर्न नृत्याविष्कार असा मनोरंजनाचा आकेस्टा कार्यक्रम झाला. शुक्रवारी सायंकाळी ४ ते ६ यावेळात जंगी कुस्त्यांचा हंगामा झाला. कुस्तीच्या जंगी हंगाम्यात नामांकीत मल्लाच्या कुस्त्या झाल्या. अनेक कुस्त्या चितपट झाल्या. अंतीम कुस्ती पैलवान निखील धोंडे व शाईन शेख यांच्यात १५ हजार रु. दवंडीची कुस्ती झाली. ऐक्य, अन् बंधुत्वाचे प्रतीक जानपीरबाबा यात्रेत सर्वधर्मसमभावाचे दर्शन! अंतिम १५ हजार रुपयाच्या रंगतदार कुस्तीने यात्रा उत्सवाची शानदार सांगता झाली. जंगी कुस्ती स्पर्धेच्या फडाने सराटेवडगावच्या जानपीर यात्रेत उत्साह. आष्टी तालुक्यातील जानपीर देवस्थानाचा यात्रा उत्सव अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात भाविक भक्तांच्या तसेच कुस्तीप्रेमी, मल्लांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. भक्तांच्या श्रद्धेला पावणारे म्हणून जानपीर देवस्थानाकडे पाहिले जाते. गेल्या



कित्येक वर्षाची या यात्रा उत्सवाची परंपरा आहे. सराटेवडगावसह आष्टी तालुक्यांमध्ये प्रसिद्ध आहे. दरवर्षी विविध भागातील विविध समाजाचे लोक याठिकाणी अत्यंत श्रद्धायुक्त भावनेने नतमस्तक होण्यासाठी येतात. यंदाच्या यात्रोत्सवात मोठी आरास करण्यात आली होती. यात्रेतील छोट्या मोठ्या उद्योग व्यवसायिकांनी मोठी गर्दी केली होती. बच्चे कंपनींच्यासाठी करमणुकीची अनेक साधने आणि वस्तूंची रेलचेल होती. विशेष म्हणजे सर्व धर्मीय आणि सर्व जाती धर्मपंथांच्या भाविक भक्तांनी जानपीर देवस्थानाच्या ठिकाणी नतमस्तक होऊन स्वतःला धन्यता मानली. या यात्रा उत्सवातील प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे राज्यभरातील आलेल्या पैलवानांनी कुस्तीप्रेमी ग्रामस्थांच्या इच्छा पूर्ण केल्या. १५ किलो वजन गटापासून ते १०० किलो वजन गटापर्यंतच्या विविध पैलवानांच्या कुस्त्या डोळे दिपवणा-या ठरल्या. अनेक कुस्त्या निकाली निघाल्या तर काही समांतर सोडवण्यात आल्या. यावेळी विभागून बक्षीस देण्यात आली. यावेळी केरुळ, आष्टी, जामखेड, यांच्यासह अनेक कुस्तीप्रेमी आवर्जून उपस्थित राहत त्यांनी पैलवानांना प्रोत्साहन दिले.


शाकाहारी प्रसाद ; जानपीर देवस्थानाचे मुख्य वैशिष्ट्य

सराटेवडगावच्या माळरानावर जानपीरबाबा यांचे हे पवित्र स्थळ आहे. याच स्थळी जानपीरबाबांचा यात्रा उत्सव असतो. येथील देवस्थानाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या देवस्थानाला गुळ, नारळ शेरनी मलिदा असा पूर्ण शाकाहारी प्रसाद वाटप केला जातो. मात्र त्यासाठी पशुहत्येची आजही परंपरा आहे.

# महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस मुळे जात निहाय जनगणना झाली नाही -वसंत मुंडे

प्रतिनिधी । परळी

भारताचे काँग्रेस पक्षाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात सन २०१४ च्या पूर्वी देशामध्ये जातनिहाय जनगणना सर्व निकषाचे पालन करून करण्यात आली. जातीवादी बीजेपीच्या नेत्यांनी ज्या त्या राज्यातील भाजपा सरकारला आर एस एस चा विचारधाराच्या वरिष्ठ नेत्यांनी जातीनिहाय जनगणनेच्या मुद्देनिहाय डाटा देण्यासंदर्भात वेळ काढून धोरण नाची गुपित अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या त्यामध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी दिनांक १२जून २०१८ ला केंद्र सरकारकडे गुपित पत्र देऊन संपूर्ण आरक्षण रद्द करण्याचे डावपेच आरएसएस मार्फत भाजपच्या विचारधारेच्या सरकारला लेखी सूचना देण्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . भारत देशा मधील प्रत्येक राज्यात पशु पक्षाची गणना केली जाते पण जातनिहाय आरक्षणासंदर्भात केली जात नाही हे दुर्दैव आहे. जातनिहाय जनगणना देशात झाली तर ५० टक्के ची आठ रद्द करून ७०% च्या आसपास आरक्षण जाईल ही खरी जातिवादी नेत्यांना भीती आहे. ओबीसी एससी एसटी अल्पसंख्यांक मागासवर्गीय जर जातीनिहाय जनगणने शासनाच्या नियमानुसार मुद्देनिहाय जनगणना झाली तर जातीवादी सरकारचा अन्याय केलेल्या नेत्यावर राजकारणातून तडीपार केल्याशिवाय राहणार नाही म्हणून तर भाजपचे सरकारला धोका होऊ शकतो हा खरा डावपेच राजकीय आहे .काँग्रेसच्या काळात मनमोहन सिंग च्या नेतृत्वाखाली पाच हजार कोटी रुपये जनगणना करण्यासंदर्भात खर्च करून जातनिहाय जनगणना करताना सामाजिक शैक्षणिक आर्थिक मागासलेपणा च्या आधारावर वर्गीकरण करून जात निहाय जनगणना आर्थिक सर्वेक्षणा च्या नियमानुसार सर्व बाबी तपासून सर्व जाती धर्मातील वंचित आदिवासी मागासवर्गीय अल्पसंख्यांक ओबीसींना न्याय देण्याचा जातीनिहाय जनगणमध्ये प्रयत्न केला गेला परंतु २०१४ नंतर देशात व राज्यात आरएसएसच्या विचारधारेचे बीजेपी सरकार आल्यावर जातनिहाय जनगणना संदर्भात उच्च व सर्वच न्यायालयात वेगवेगळ्या मुद्द्याखाली याचिका दाखल करून दीड टक्क्याची त्रुटी काढून सरकारने आरक्षणासंदर्भात निर्णय झालेला असताना रद्द करण्यात चे आदेश शासन स्तरावर काढण्यात आले असून तसा पत्र व्यवहार शासनाकडून



सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेला आहे . त्यामध्ये दिनांक १२ जून २०१८ ला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी केंद्र सरकारकडे गोपनीय पत्र देऊन जात निहाय जनगणनेला विरोध केल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला आहे.




परळी - सद्भावना सत्याग्रह भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ बीड जिल्हा काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे पक्षाचे पक्ष निरीक्षक अमर खानापुरे तर पक्षाचे सांगलीचे निरीक्षक आदित्य पाटील तसेच काँग्रेसचे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी आजच्या सत्याग्रहाला उपस्थित होते.

# सावळेश्वर उद्योग समूहाची गगनभरारी ; स्वराज ट्रॅक्टर ची ७५ दिवसात केली १०० ट्रॅक्टरची विक्रमी विक्री

प्रतिनिधी @ आष्टी



सावळेश्वर उद्योग समूहाने अल्पावधीतच गगनभरारी घेतली आहे. हजारो ग्राहकांच्या विश्वासास पात्र होत संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे यांनी ग्राहकांना जलद व उत्तम प्रकारे सेवा देत आष्टी तालुक्यातील लोकांची मने जिंकली आहेत व नावलौकिक मिळवला आहे. आष्टी शहरात १९ फेब्रुवारी रोजी सावळेश्वर ट्रॅक्टर या नवीन ट्रॅक्टर शोरुमचा भव्य शुभारंभ झाला. शुभारंभाच्या दिवशी १९ ट्रॅक्टर वितरित केले होते तसेच अवघ्या ७५ दिवसांच्या कालावधीत १०० ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री झाली आहे. तात्काळ बुकिंग करणाऱ्या ग्राहकांना बंपर ऑफर दिल्याने पसंती मिळाली.

सावळेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी ट्रॅक्टर उद्योग जगतात २०१६ पासून पाऊल ठेवले. त्यांनी जामखेड, कडा, आष्टी, पाथर्डी, शेवगांव, खर्डा ठिकठिकाणी विविध ट्रॅक्टर च्या डिलरशिप मध्ये ही मोठ्या प्रमाणावर विक्री केली. आष्टी शहरात १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती च्या शुभमुहूर्तावर सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नावाने स्वराज ट्रॅक्टरचे नवीन ट्रॅक्टर शोरुमचा भव्य शुभारंभ संपन्न झाला. यावेळी भव्य बंफर आफर ठेवल्याने तात्काळ बुकींग करणा-यास सवलत देण्यात आल्याने अवघ्या ७५ दिवसांत १०० स्वराज ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री झाली आहे. सद्य स्थितीत बेरोजगार, तरुण व नागरीकांच्या हाताला काम मिळत असल्याने काही प्रमाणात तालुक्यात बेरोजगारीचे प्रमाण कमी झाले आहे. दनगट व कमी खर्चात ज्यादा काम करणाऱ्या स्वराज्य ट्रॅक्टने आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना भुरळ घातली आहे. हा विक्रमी सेलचा टप्पा ओलांडण्यासाठी संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे यांच्या सह स्टेट हेड गुप्ता साहेब, विभागाचे मॅनेजर गिरीश जाधव, टेरेटरी मॅनेजर चेतन मुंडे साहेब, मॅनेजर प्रकाश कदम, मॅनेजर राजू साबळे, अकाउंट प्रांजली उगले, सुजाता सायकड, रेणुका वैद्य, सर्विस मॅनेजर रंजीत मुंडे, आप्पासाहेब गायकवाड, सेल्स टीम मध्ये आकाश शेळके, लखन आजबे, सागर निकरड, जालिंदर भवर, गीते, दादा पोकळे, सर्विस टीम मध्ये हनुमान घरगणे, आकाश पवार, कृष्णा भवर, इब्राहिम पठाण, रवींद्र खंडागळे, नामदेव हराळ, ओंमकार सोले, स्वप्नील बरकडे, कुमार विश्वकर्मा आदींच्या अथक परिश्रमाने ग्राहकांना जलद सेवा दिल्याने विक्रमी विक्रीचा टप्पा पार केला आहे. सर्व टीमचे तसेच ग्राहकांचे रमेश दादा आजबे यांनी मनापासून आभार मानले आहेत.

# डॉ.बाबासाहेब ठोंबरे 'मराठवाडा आयकॉन'ने सन्मानित


## सर्वस्तरांतून डॉ.ठोंबरे यांच्या निवडीचे स्वागत



प्रतिनिधी @ लातुर

मराठवाडा विभागातील लातूर व बीड जिल्ह्यात प्राधान्याने कृषि संस्कृतीशी निगडित असलेल्या पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र या महत्त्वाच्या क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य तसेच पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने मोठे आणि व्यापक प्रमाणात केलेली वृक्ष लागवड तसेच वृक्ष संवर्धनाची सातत्यपूर्ण व अखंडितपणे केलेली यशस्वी कामगिरी या कृषि व पर्यावरणातील बहुमोल कार्याची दखल घेऊन, कृषि महाविद्यालय लातूरचे अधिष्ठाता व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय लातूरचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांना शनिवारी मध्य आणि पश्चिम भारतातील सर्वांत मोठे माध्यम समूह असलेल्या नवभारत - नवराष्ट्र यांच्या वतीने दिला जाणारा 'मराठवाडा आयकॉन'ने एका विशेष सन्मान सोहळ्यात सन्मानित करण्यात आले. डॉ.ठोंबरे यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

# कामाचा दादा...!



प्रशासकीय अधिकारी, काही पदाधिकारी यांचा विरोध असतानाही, अखेरीस संस्थेवर लोकनियुक्त कार्यकारी मंडळ स्थापन करण्यासाठी समिती गठित करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी घेतला. बहुतांशीचां प्रखर विरोध असतानाही योग्य काय ? याची काही वेळात उकल करून निर्णय घेणे तसे सोपे काम नाही. पण प्रत्येकाच्या मताचा सन्मान करत, योग्य निर्णय घेण्याची क्षमता अजितदादा यांच्याकडे असल्याचा अनुभव बैठकीत आला. त्यामुळे वारसा, भावनिक लाट यावर दादा सत्ता पदावर नाहीत. तर निर्णय क्षमता आणि कष्टाच्या बळावर टिकून असल्याचे ठळकपणे जाणवते. सकाळी सहा वाजल्यापासून कामाला सुरुवात,वेळेत काम करण्याची हातोटी यामुळेच उपमुख्यमंत्री पदावर टिकून राहण्याची किमया साधली आहे.

स्पष्ट बोलण्या बरोबरच चुकीच्या गोष्टी थेट नाकारण्याच्या स्वभावामुळे, प्रसार माध्यमातून त्यांच्या बाबतीमध्ये सातत्याने रागीट, उद्धट, असं चित्र काही घटनांवरून रंगवल जातं आणि तशीच प्रतिमा लोकांच्या मनामध्ये तयार होते.आपणही न भेटता, अनुभव न घेता आपलं मत तयार करतो.पण एखादेवेळी कामा निमित्ताने संबंध येतो,तेव्हा मात्र हा नेता खरं काय ते ओळखनारा आणि तात्काळ निर्णय घेणारा आहे.याचाच अनुभव येतो हे अनेकांच्या बाबतीत घडले असाते.असंच अनुभव मंगळवारी (२९ एप्रिल )बैठकीच्या निमित्ताने आला. प्रत्येकाची भूमिका समजून घेत, चुकीच्या गोष्टीना लगेच फटकारणे, यामुळे त्यांचा प्रशासकीय यंत्रणेत प्रचंड धाक असल्याचे दिसून येते.

भाजप महायुतीच सध्या अजित दादा पवार आहेत.मात्र राजकीय विरोधक म्हणून तीस वर्षीत भाजप नेतृत्वाने आणि प्रसार माध्यमांनी प्रस्थापित राजकारणी म्हणून त्यांच्या वर काही आरोप करत त्यांची नकारात्मक प्रतिमा तयार करण्याचा प्रयत्न केला होता. पण कोण काय म्हणेल आणि कोणाला काय वाटते? याचा विचार न करता जे असेल ते स्पष्ट सांगुण आपले काम करत रहाणे हेच त्यांचे धोरण दिसते.त्यामुळे अनेदा पत्रकार इतर नेत्यांच्या विधानावर त्यांची भूमिका विचारतात तेव्हा पत्रकारांनाही खडे बोल सुनावण्यास कचरत नाहीत. त्यांची भूमिका आणि कामाचा धडाका बघितला तर हा माणूस कामाचा तर आहेच पण राज्यातील सर्वसामान्यांच्या हिताचा असल्याचे जाणवणे.

पक्षीय राजकारणतून काही वर्षांपूर्वी शालेय मुलांना धाडस,सहासा आणि राष्ट्रभक्तीचे मूल्य शिक्षण देणाऱ्या संस्थेतील काही पदाधिकाऱ्यांवर आरोपांचा कांगवा करून पक्षीय राजकारणतून तत्कालीन मंत्र्यांनी कार्यकारी मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमले.परिणामी ही मूल्य शिक्षण देणारी चळवळ जवळपास बंद पडली.चळवळीशी संबंधित आणि तळमळ असणाऱ्यांनी सातत्याने अनेक नेत्यांना हा विषय सांगून लक्ष घालण्याचा आग्रह धरला. मात्र

लोकप्रतिनिधींनी विषय समजून घेण्याचे औदार्य ही दाखवले नाही. लोकांच्या मनातील आम्हीच सत्ताधारी समजणाऱ्या नेत्यांनाही अनेकदा हा विषय सांगून पाहील पण उपयोग झाला नाही.एकदा तर संबंधित विभागाच्या मंत्र्याकडे येण्याची विनंती केली तेव्हा त्यांना संबंधिताकडे येणे कमीपणाचे वाटले. वर्षानुवर्ष संबंधित असल्याने या विषयात लक्ष घालावे यासाठी घेटे घातले पण आम्ही अशा 'छोट्या छोट्या' कामांसाठी नाहीत,आमची राजकिय उंची खुप मोठी अशी त्यांची भूमिका राहीली.

मात्र गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी विषय एकाच भेटीत समजून घेतला. विषय काय आहे, यापेक्षा कोण सांगतायत या भावनेतून त्यांनी तात्काळ उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पत्र देऊन संबंधित विभाग आणि पदाधिकारी यांची बैठकच लावली. बैठकीतही नियमानुसार,प्रसंगी आक्रमकपणे बाजू मांडली. आणि प्रशासकीय यंत्रणेचा प्रखर विरोध असतानाही संस्थेवर लोकनियुक्त संचालक मंडळ स्थापन करण्यासाठी आग्रह धरला. अजितदादा यांनीही बैठकीत प्रत्येक सदस्याचे मत ऐकून घेतलं. काही लोक वैयक्तीक हेतू ठेवून अनावश्यक विरोध करत होते त्यांना प्रसंगी खडेबोल ही सुनावले. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मांडलेली भूमिका कशी अयोग्य आहे. हे समजून सांगुन काही पदाधिकाऱ्यांवर आरोप असतील तर त्यांची चौकशी करून कारवाईची आपल्याकडे तरतूद आहे. मात्र पदाधिकाऱ्यांवर आरोप झाला म्हणून लोकनियुक्त कार्यकारी मंडळची निवडणुकाच कायमची रद्द करून संस्था प्रशासकीय यंत्रणेच्या ताब्यात ठेवणे हे लोकशाही मूल्यांना धरून नाही.आपण सर्व लोकशाही प्रक्रिया मानणारे आहोत. त्यामुळे असे करता येणार नाही हे स्पष्ट करून कार्यकारी मंडळ स्थापन करण्यासाठी समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला. पाऊण तासाच्या बैठकीत अजित दादा यांची एकूण काम करण्याची पद्धत प्रत्येक सदस्याचं मत जाणून घेऊन त्यावर आपली भूमिका मांडण्याची हातोटी आणि योग्य काय? याचा निर्णय घेण्याची क्षमता स्पष्टपणे दिसून आली.

अनेक वर्ष माध्यमात काम करत असल्याने प्रशासकीय बैठका कशा होतात आणि निर्णय कसे घेतले जातात याची पुरेपूर माहिती आहे. मात्र अजितदादा यांच्याबरोबरच्या पहिल्याच बैठकीला अनुभव अत्यंत वेगळा आणि आशावर्धक वाटला. अशा नेतृत्वातच सामान्यांचे हित साधल जाऊ शकते. कार्यकर्ते सामान्य माणसाचे जीवनमान उंचावलं जाऊ शकतं.

अन्यथा वेळ देऊनही न भेटने, काम घेऊन दारत आलेल्या लोकांना का ? आले म्हणून हीनतेची वागणू देणे आणि लोकांना त्यांच्या प्रश्नानभोवतीच झुंजवत ठेवणे.आणि केवळ मतदानासाठी जातीपातीच्या लाटा निर्माण करून आपल्या नेतृत्वांच्या पोळ्या भाजणाऱ्यांकडून अपेक्षाभंगा शिवाय काही साध्य होत नसल्याने लोकांचा राजकीय नेत्यांवरील विश्वासच राहीला नाही.अशा राजकीय वातावरणतही अजितदादा पवार हा नेता केवळ कष्ट आणि कामाच्या बळावरच लोकांच्या मनात टिकून आहे.आणि कामाचा दादा म्हणून लोक पाठबळ देत राहतील. महाराष्ट्राच्या राजकारणात इतकी वर्ष उपमुख्यमंत्री म्हणून सरकार कोणतेही असो आपलं स्थान कायम ठेवणे सोपी गोष्ट नाही.

महाराष्ट्रात अनेकांना संधी मिळते कोणाला राजकीय वारसांने तर कोणाला भावनीक लाटेवर तेव्हा पदापेक्षा लोकांपेक्षा आपण वेगळे झालोत या अविर्भावात नेते वावरतात आणि कमी काळात त्यांचा आलेख उतरायला लागतो हे सातत्याने घडते. याला अजित दादा पवार हे अपवाद ठरतात ते त्यांच्या कार्यशैलीने. त्यांचा वक्तशीरपणा, स्पष्टोक्तेपणा, निर्णय घेण्याची क्षमता, हे गुण इतर राजकीय नेत्यांमध्ये पाझरले तर राजकीय व्यवस्था दुरुस्त व्हायला मोठी मदत होऊ शकते.त्यामुळेच शायर अशोक साहील यांच्या शब्दांत सांगायचं तर

नजर नजर में उतरना कमल होता है,
नब्ज नब्ज में बिखरना कमल होता है
बुलंदियों पे पहुंचाना कोई कमाल नहीं,
बुलंदी यों पे ठहरना कमल होता है।

**वसंत मुंडे, बीड**

# बीड जिल्ह्यात भोंदूगिरी व लोकांची फसवणूक करणाऱ्यांची नांवे कळवावेत

## अंनिसचे जिल्हाध्यक्ष हनुमंत भोसले यांचे आवाहन

प्रतिनिधी @ बीड



सध्या बीड जिल्ह्यातील अनेक गावांत भोंदूगिरी ची व लोकांच्या समस्या निवारण करण्यासाठी बघण्याचा नावाखाली कांही लोक देवाच्या नावाखाली प्रचंड आर्थिक,लैंगिक व मानसिक लूट करत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.असे लोक समाजासाठी घातक असून ते समाजाचे शत्रू आहेत. अशा आपापल्या परिसरातील समाजाचे शोषण करणाऱ्या लोकांची नावे,पत्ता व तपशिलवार माहिति महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती बीड जिल्हा यांच्याकडे पाठविल्यास याबाबत ची सत्यता शोधून समिती अशा फसवणूक करणाऱ्या लोकांवर महाराष्ट्र जादूटोणा विरोधी कायद्याअंतर्गत बीड पोलिसांच्या साह्याने कार्यवाही करणार आहेत. समाजाची ईश्वरविषयक श्रद्धा मान्य करता येते. मात्र विविध समस्यांनी ग्रस्त समाजाला त्यांच्या श्रद्धेचा व मजबुरीचा आणि असह्यातेचा फायदा घेऊन हे लोक फसवत आहेत.यांचा आणि ईश्वराचा दुरुनही संबंध नसतो फक्त आपल्या या काळ्या व फसव्या धंद्यालासंरक्षण मिळावे म्हणून असे लोक देव देवतेचा आड घेऊन त्यांच्या नावाचा वापर करतात. आपणांस देव-देवी प्रसन्न आहे असे सांगून लिंबू,नारळ,हळद,कुंकू इत्यादींचा वापर करून लोकांना फसवतच आहेत.आजार किंवा इतर शारीरिक समस्ये वर वैद्यकीय उपचार हाच पर्याय आहे.मात्र ते करण्याऐवजी हे लोक त्यांच्यावर अघोरी उपचार,मंत्र म्हणणे किंवा कर्मकांडाचा उपचार करण्यासाठी भाग पाडतात.अशा लोकांवर महाराष्ट्र राज्य जादूटोणा विरोधी कायद्यांतर्गत अत्यंत कठोर शिक्षाही होऊ शकते.यासाठी बीड जिल्ह्यातील तालुका व गावपातळीवरील जागरूक युवकयुवती व नागरिकांनी अशा समाजाला फसवून समाजाचे शोषण करणाऱ्या लोकांची नांवे समितीकडे पाठवावीत असे आवाहन बीड जिल्हा अंनिसचे जिल्हाध्यक्ष हनुमंत भोसले मो.नं. ९४२३७३३८८८ व बीड जिल्हाकार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण मो.नं. ९४२१४४३१७२ यांनी केले आहे.माहिती देणारांची नावे गोपनीय ठेवले जातील असेही समितीने म्हटले आहे.

# वंजारवाडीच्या मयत वारसांना आणि जखमींना अर्थसहाय्य मंजूर करावे

## मुख्यमंत्र्यांकडे आ.सुरेश धस यांची मागणी

प्रतिनिधी @ आष्टी



आष्टी तालुक्यातील मजूर महिला पुरुष आणि बालकांसह वंजारवाडी येथून कडा येथे जात असताना सकाळी १०.५० या वेळी देवीनिमगाव या गावाजवळ हे पिकअप वाहन टायर फुटल्याने उलटले, दोन तीन पलट्या झाल्या. या अपघातामध्ये अजित विठ्ठल महाजन वय १४ वर्षे, कु. श्रावणी विक्रम महाजन वय १३ वर्षे, आणि कु. ऋतुजा सतीश महाजन वय १६ वर्षे यांना जबर मार लागल्याने ते मयत झाले तर २० जखमी झाले. कामगार दिनी रस्ता अपघातामध्ये मयत झालेल्या ३ मजुरांच्या वारस कुटुंबियांना आणि जखमी मजुरांना मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी द्वारे अर्थसाह्य मंजूर करावे अशी मागणी पत्राद्वारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आष्टी, पाटोदा, शिरूर मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांनी केली आहे.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील वंजारवाडी ता. आष्टी, जि. बीड येथील महिला, पुरुष हे मजूर दि. १ मे २०२५ रोजी आपल्या मुलांसह कांदा भरण्यासाठी दिलीप विलास महाजन यांच्या पिकअप वाहन क्र. एम. एच. - १ - एल - २६८५ या वाहनाद्वारे वंजारवाडी येथून कडा येथे जात असताना सकाळी १०.५० या वेळी देवी निमगाव या गावाजवळ हे पिकअप वाहन उलटले. दोन तीन पलट्या झाल्या या अपघातामध्ये अजित विठ्ठल महाजन वय १४ वर्षे, कु. श्रावणी विक्रम महाजन वय १३ वर्षे, आणि कु. ऋतुजा सतीश महाजन वय १६ वर्षे यांना जबर मार लागल्याने ते मयत झाले असून कु. पल्लवी सतीश महाजन, शकुंतला सूर्यभान नरवडे, आशाबाई पोपट नरवडे, गीताबाई आजिनाथ नरवडे, अर्चना नितीन नरवडे, कांताबाई ज्ञानदेव महाजन, स्वाती दिलीप महाजन, शांताबाई नरवडे, अंकिता बन्सी नरवडे, नंदा नितीन नरवडे, संगीता अशोक महाजन, आशाबाई बाळू महाजन, द्वारकाबाई बबन महाजन, वैष्णवी बाळू नरवडे, सुलाबाई पोपट महाजन, शीतल पोपट नरवडे, मनीषा शिवनाथ गोरे, धोंडाबाई नितीन नरवडे, सिंधुबाई ज्ञानदेव महाजन, श्रावणी दिलीप महाजन, आणि राजश्री विठ्ठल महाजन सर्व रा. वंजारवाडी, ता. आष्टी, जि. बीड हे जखमी झाले आहेत. हे सर्व मजुरी करणाऱ्या वर्गातील ग्रामस्थ असून जबर जखमी झाल्यामुळे काम करता येणार नसल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणी येणार आहेत. कामगार दिनी झालेल्या अपघातामधील मयत ३ व्यक्तींच्या वारस कुटुंबियांना आणि २० जखमी झालेल्या मजूर नागरिकांविषयी अत्यंत सहानुभूतीपूर्वक विचार होऊन त्यांना मुख्यमंत्री सहायता निधीद्वारे अर्थसहाय्य मंजूर करण्यात यावे. या साठी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून अर्थसहाय्य मंजूर करावे अशी विनंती आ. सुरेश धस यांनी केली आहे.



# प्रा.अब्दुल अजीज अन्सारी यांचा सेवागौरव सोहळा संपन्न

प्रतिनिधी @ माजलगांव

म.शि.प्र.मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्रा.अब्दुल अजीज अन्सारी यांच्या सेवापुर्ती निमित्ताने सेवागौरव करण्यात आला.यावेळी म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आ.राधाकृष्ण होके पाटील,विजयकुमार सोळंके,ॲड.बी.आर.डक, सत्यप्रकाश रुद्रवार,डॉ.सुनील गरड यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा.अन्सारी यांच्या सेवागौरव निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.जी. के.सानप,उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे,उपप्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे,उपप्राचार्य प्रकाश गवते,उपप्राचार्य पवनकुमार शिंदे,प्रा.महादेव अलझेंडे,प्रा.लतीफ पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. सानप म्हणाले की,प्रा.अन्सारी यांची ओळख विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून आहे.त्यांनी प्रमाणितपणे सेवा केली. अध्यापन व प्रशासकीय कामातील त्यांच्या अनुभवाचा फायदा महाविद्यालयाला झाला.त्यांनी महाविद्यालयात काम करत असताना नोकरी न समजता सेवा म्हणून आपले कर्तव्य पार पाडले.यावेळी सेवपूर्ती निमित्त बोलताना प्रा. अन्सारी म्हणाले की,म.शि. प्र.मंडळात शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली हे भाग्य समजतो.ग्रामीण भागातील विद्यार्थी केंद्रबिंदु ठेवून मी माझी सेवा प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न केला आहे.यावेळी उपप्राचार्य प्रकाश गवते,प्रा. संजय बागुल,प्रा.लतीफ पठाण,प्रा.राजेंद्र जाधव, प्रा.जितेंद्र ठोंबरे,प्रा.बबन उदावंत,प्रा.विकास शिंगणे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रा.अन्सारी यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी प्राध्यापक,कर्मचारी यांची उपस्थिती होती.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# खरीप हंगामाची पेरणी सुरु होण्यापूर्वी शेतकऱ्यांना बियाणे, खते व पीक कर्ज, उपलब्ध करुन द्या-पालकमंत्री पंकजा मुंडे

## जिल्ह्यात खरीप हंगामात ६ लाख २९ हजार हेक्टरवर होणार पेरणी

जालना ।प्रतिनिधी

खरीप हंगामातील पेरण्या सुरु होण्यापूर्वी शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते व पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी आतापासूनच योग्य नियोजन करण्याचे निर्देश राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात खरीप हंगामपूर्व तयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्रीमती मुंडे या बोलत होत्या. यावेळी खासदार कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार बबनराव लोणीकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण, आमदार राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, प्रभारी जिल्हा पोलीस अधीक्षक आयुषकुमार नोपाणी, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, विभागीय कृषी सहसंचालक पी.आर. देशमुख, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी जी. आर. कापसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, कृषी विभागाने यावर्षी खरीप हंगामातील पेरणीचे प्रस्तावित क्षेत्राच्या प्रमाणात बियाणे रासायनिक खते शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. तसेच पावसाअभावी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येवू नये. पुरेसा पाऊस झाल्यावरच शेतकऱ्यांनी पेरणी करावी. यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यामध्ये व्यापक जनजागृती करावी. तसेच पीक पेरणीची योग्य पद्धत, बियाणांची निवड आणि पेरणीपूर्व प्रक्रिया, पेरणीचा योग्य कालावधी आदीबाबतीची माहिती शेतकऱ्यांना द्यावी. शेतकऱ्यांपर्यंत अत्याधुनिक तंत्र पोहोचविण्यासाठी क्षेत्रिय कर्मचारी आणि शेतकऱ्यांनी समन्वय ठेवावा. शेतक-यांना विविध पिकांच्या पेरणीची योग्य वेळ आणि पद्धत, त्या पिकांवर येणारे रोग आणि त्याअनुषंगाने करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना



याविषयी सविस्तर माहिती देण्यासाठी कृषी विभागाने विशेष मोहीम राबवावी. जमिनीची उत्पादकता वाढवून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळेल यासाठी प्रयत्न करावा. जिल्ह्यात बोगस बियाणे आणि रासायनीक खतांची विक्री होवू नये, यासाठी पथके स्थापन करुन, दोषींवर कायदेशीर कारवाई करावी. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त होताच पंचनामे करुन बियाणे नमुने तपासण्यापेक्षा बियाणे पुरवठादारांकडील साठे तपासून त्याचवेळी त्याची गुणवत्ता तपासावी. तसेच जादा दराने खत विक्री करणे, खतांचा साठा करून ठेवणे, असे अवैध काम करणाऱ्या विक्रेत्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी व त्यांच्या तक्रारींच्या निराकरणासाठी योग्य उपाययोजना कराव्यात. तसेच खरिप हंगामाकरीता शेतकऱ्यांना बँकेच्या माध्यमातून होणारे कर्ज वितरणाचे उद्दिष्ट हे जून पर्यंत पूर्ण करावे. शेतकऱ्यांना बँकेत चकरा माराव्या लावू नये याची दक्षता घ्यावी. तसेच पात्र लाभार्थ्यांना पंतप्रधान कुसुम योजना आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजनाचा लाभ वेळेत मिळावा यासाठी नियोजन करावे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना अंतर्गत लाभार्थ्यांना वेळेत लाभ देण्यात यावा अशा सूचना पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी संबंधीतांना दिल्या.

तसेच जिल्ह्यातील ज्या गावातून टँकरची मागणी होताच, त्या गावास तात्काळ पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच टँकर, पुरक नळ योजना, विहिर अधिग्रहण इत्यादी उपाययोजनांद्वारे सर्वसामान्य नागरिकांना पाणी टंचाईचा त्रास होणार नाही याची जिल्हा प्रशासनाने दक्षता घ्यावी असे निर्देश ही पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले.

जिल्ह्यात ६ लाख २९ हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या पेरणीसाठी नियोजन आज सादर करण्यात आले. त्यात सर्वाधिक क्षेत्रावर म्हणजेच २ लाख २१ हजार हेक्टरवर सोयाबीन तर २ लाख ९१ हजार हेक्टर क्षेत्रावर कापूस या पिकांचे नियोजन करण्यात आले आहे. कापूस आणि सोयबीन पिकासाठी बियाण्यांची उपलब्धता करण्यात आली आहे. जिल्ह्यात कापूस पिकाच्या नियोजित क्षेत्रावर पेरणीसाठी बियाण्यांची ११ लाख ५१ हजार पाकिटे लागणार आहेत. त्याचे नियोजन करण्यात आले असून, सोयाबीन पिकासाठी ६५ टक्के घरच्या बियाण्यांचा वापर होणार आहे. तसेच उर्वरीत ३५ टक्के म्हणजे ५७ हजार ५६५ क्विंटल बियाण्यांचे नियोजन करण्यात आले आहे. सोबतच खरीप ज्वारी, मुग, तूर, उडीद, भुईमूग, सूर्यफुल, तीळ या पिकांच्या पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. या सर्व पिकांच्या लागवडीसाठी ७३ हजार ०७६ क्विंटल बियाण्याची आवश्यकता असून, त्याची मागणी नोंदविण्यात आली आहे. तसेच खरिप हंगामाकरीता आवश्यक व अपेक्षित बियाणे, खते, किटकनाशके यांचे योग्य नियोजन कृषी विभागामार्फत करण्यात आल्याचे यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जी. आर. कापसे यांनी सांगितले.

# आंबेडकरी अनुयायांनी बुद्ध धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी पुढाकार घ्यावा – पप्पु कागदे

प्रतिनिधी @ बीड

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील प्रचलित धर्माचा अभ्यास केला होता. त्या धर्मामध्ये बौद्ध धम्माने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रभावित केले होते. बुद्ध धम्मात जाती-भेद-उच्च-निच अस्पृश्यतेला थारा नव्हता. या धम्मात सर्व मानव समान आहेत. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली धर्मांतराची घोषणा केली होती. मी हिंदू म्हणून जरी जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. अशी घोषणा करुन १४ आक्टोबर १९५६ साली नागपुरात बुद्ध धम्माची दिक्षा घेऊन तथागताच्या बुद्ध धम्माचा स्वीकार केला. तथागताच्या बुद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी पुढाकार घ्यावा. असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती प्रसंगी मांजरसुंबा, जरूड, आंबे सावळी, म्हाळसापूर, जवळा, आहेर चिंचोली येथे केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, धर्म हा केवळ कायदा किंवा आज्ञा नसाव्यात. ज्या क्षणी धर्माचे रूपांतर कायद्यात होते, त्या क्षणाला तो धर्म भष्ट्र होतो. खऱ्या अर्थाने धर्म धार्मिक संकल्पनेचा गुणच मारुन टाकतो. जीवन व वास्तव यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोण आणि विचारात बदल करणे म्हणजेच धर्मांतर ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. म्हणूनच दया, क्षमा, शांती व करुणेचा संदेश देणाऱ्या तथागत भगवान गौतम



बुद्धाच्या धम्माची नागपूर मुक्कामी लाखो अनुयायांना सोबत घेऊन दिक्षा घेऊन सारा भारत बुद्धमय करण्याचा संकल्प केला होता. आगामी काळात

बुद्ध धम्माचा प्रसार करून धम्म चक्र गतिमान करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी पुढाकार घ्यावा.यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, सुभाष तांगडे, शाम वीर, विशाल इंगोले, संदिप इंगोले विकास कोरडे, गौतम कोरडे, प्रमोद वाघमारे, बाळासाहेब गव्हाणे,बिभीषण जावळे,रामेश्वर खळगे, भाऊसाहेब कांबळे, देवानंद वाघमारे, अविनाश वाघमारे, नामदेव वाघमारे, महादेव ईनकर, अनंत विद्यागर यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.




# मौजे आष्टी ग्रामपंचायतच्या भ्रष्टाचार विरुद्ध जिल्हा परिषद जालना कार्यालयासमोर भगवान वाघमारे यांच्या उपोषणाला आज चौथा दिवस

जालना ।प्रतिनिधी

परतूर तालुक्यातील मौजे आष्टी ग्रामपंचायतचे सरपंच आणि ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत मध्ये अनागोंदी कारभार करुन १५ व्या वित्त आयोगामध्ये आलेला लाखोचा निधी, घरकुल मधील कुठलेही काम न करता बिल उचले,एम.आर.जि.एस.अंतर्गत बोगस कामे घरकुल लाभार्थ्यांकडून पैसे घेऊन घर न बांधता बिले उचलणे,अशा विविध विकास कामाच्या निधीत मोठा भ्रष्टाचार केला आहे.या भ्रष्टाचाराच्या विरोधात भगवान रंगनाथ वाघमारे यांनी वारंवार तक्रार करुन ही तक्रारीवर कसल्याही प्रकारची चौकशी होत नसल्यामुळे तक्रारदार भगवान रंगनाथ वाघमारे यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांना मौजे आष्टी ग्रामपंचायत चे सरपंच आणि ग्रामसेवक यांनी संगनमत करून महात्मा ज्योतिबा फुले व्यापारी संकुलनचे काम अर्धवट असून त्यामधून बिअर बार साठी रस्ता कोणत्या आधारावर ठेवला आहे.एम.आर.जि.एस.मधील अहिल्यादेवी सिंचन विहीरीचे आणि पादंण रस्त्याची व रमाई घरकुल व ओबीसी घरकुल योजनेतील सरपंच आणि ग्रामसेवक यांच्या भ्रष्टाचाराच्या चौकशी संदर्भात निवेदन देऊन दि.१ मे रोजी पासून जिल्हा परिषद जालना कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले असून आज उपोषणाचा चौथा दिवस आहे.गेंड्याच्या कातडीचे अधिकारी अजूनही उपोषण कर्त्यास भेटायला आले नाहीत व उपोषण कर्त्याच्या निवेदन व तक्रारीवर कसल्याही प्रकारची दखल घेतली नसून उपोषण कर्ता भगवान रंगनाथ वाघमारे यांचा तबियत खालावली असून याची वरिष्ठांनी दखल घेऊन मौजे आष्टी ग्रामपंचायत चे सरपंच आणि ग्रामसेवक यांनी संगनमताने केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी उपोषण कर्ता भगवान रंगनाथ वाघमारे यांना न्याय मिळेपर्यंत उपोषण सुरु राहील

# मराठवाड्याचा पाणी प्रश्न, सिंचनाचा अनुशेष, पाण्याची तुट, शेतकरी आत्महत्या

## या प्रादेशिक प्रश्नांवर अविरतपणे संघर्ष करणारे व्यक्तिमत्व म्हणजेच सिंचन अभ्यासक नितीन पाटील खोडेगावकर

छत्रपती संभाजी नगर ।प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षाची सांगता झाली त्यानिमित्ताने दिनांक १६ सप्टेंबर रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक मराठवाड्याची राजधानी असलेल्या औरंगाबाद येथे झाली जलविकास व व्यवस्थापन आणि पाण्याचे समन्यायी वाटप याबाबत मराठवाड्याचा पाणी प्रश्न नक्की आहे तरी काय ? याचा तपशील व तांत्रिक विश्लेषण पुढील प्रमाणे या लेखात आहे

बांधकामाधीन प्रकल्प-महाराष्ट्रातील गोदावरी नदीचा एकात्मिक जल विकास आराखडा जून २०१७ मध्ये तयार करण्यात आला या आराखड्यात मराठवाड्यातील बांधकामाधीन प्रकल्पांचा तपशील देण्यात आलेला आहे त्यानुसार मार्च २०१६ मध्ये मराठवाड्यात आठ मोठे,सहा मध्यम आणि चाळीस लघु असे एकूण ५४ राज्यस्तरीय सिंचन प्रकल्प बांधकामाधीन होते त्यांची एकूण अद्ययावत किंमत(मार्च २०१६अखेर) २१ हजार ७१७ कोटी रुपये, तर ते प्रकल्प पूर्ण करण्यासाठीची उर्वरित किंमत ११ हजार ८८ कोटी रुपये(एप्रिल २०१६) इतकी होती मोठे प्रकल्प सरासरी ३७ वर्ष, तर मध्यम प्रकल्प सरासरी २६ वर्ष रखडलेले आहेत( लघु प्रकल्पांचा तपशील देण्यात आलेला नाही.)

-जलनियोजनाची ऐशी-तैशी-जायकवाडी प्रकल्प व त्याचे लाभक्षेत्र निम्न गोदावरी खोऱ्यात,तर पाणलोट क्षेत्र मात्र उर्ध्व गोदावरी खोऱ्यात आहे जायकवाडीच्या मूळ नियोजनातील गृहिते(सर्व आकडे टीएमसी मध्ये) पुढीलप्रमाणे आहेत-उर्ध्व गोदावरी खोऱ्यात जायकवाडीपर्यंत पाण्याची उपलब्धता-१९६ टीएमसी आहेयापैकी नाशिक आणि नगर जिल्ह्यातील धरणांकरीता ११५ टीएमसी पाणी आहे - ७५ टक्के विश्वासार्हतेचा जायकवाडीचा येवा-९४.४- संकल्पित उपयुक्त साठा-७७,-निभावणीचा साठा-१३,-जायकवाडीतुन माजलगाव प्रकल्पात सोडायचे पाणी-१२.४,-पिण्याचे, घरगुती वापराचे आणि औद्योगिक वापराच्या पाण्याची तरतूद नाही- जलाशयावरून उपसा सिंचनाची तरतूद नाही - प्रवाही सिंचनासाठी पाणी-४९ पण कटू वास्तव वेगळे आहे उर्ध्व गोदावरी खोऱ्यात जायकवाडी पर्यंत पाण्याची उपलब्धता १९६ नव्हे,तर १५६ एवढीच आहे असे आता शासन म्हणते नाशिक आणि नगर भागात मूळ नियोजनापेक्षा जास्त क्षमतेची धरणे बांधली गेली त्या धरणांची प्रत्यक्ष साठवण क्षमता १५० टीएमसी म्हणजे ३५ टीएमसी अधिक आहे पण पाण्याचा प्रत्यक्ष वापर त्यापेक्षा जास्त होतो कारण खरिपात धरणातील पाणी कालव्याद्वारे सर्वत्र बेकायदा फिरवले जाते त्यामुळे धरणातील पाणी पातळी कमी होते त्या भागात पाऊसमान चांगले असल्यामुळे धरणे परत भरतात या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे सर्वसामान्य पर्जन्यमानाच्या वर्षातदेखील आता जायकवाडी प्रत्यक्ष आवक आता २८.२२ टीएमसी म्हणजे ३० टक्के एवढीच येईल तात्पर्य हा प्रकार असाच चालू राहिला तर जायकवाडी यापुढे कधीही पुर्ण भरणार नाही अधिकारी म्हणतात

'विज्ञान आणि तंत्रज्ञानात बदल झाला. पण हे फक्त जायकवाडी बाबतीतच कसे घडले? जायकवाडीच्या समकालीन आणि इतर प्रकल्पांत का नाही झाले तसे ? उत्तर नाही ! ठीक आहे ४० टीएमसी तूट आहे हेही मान्य.पण, सगळी तूट जायकवाडी वरच टाकत ? जायकवाडी आणि तिच्या वरच्या सर्व प्रकल्पांमध्ये तुटीचे समन्यायी वाटप का नाही करत ?

-बिगर सिंचन-फेरनियोजनात घरगुती आणि औद्योगिक मंजूर पाणी वापर अनुक्रमे ११८ व ७६ दलघमी दाखविण्यात आला आहे. मेंढेगिरी समितीच्या अहवालात मात्र मंजूर घरगुती वापर २८३ दलघमी आणि औद्योगिक वापर १६१ दलघमी दाखविला आहे औद्योगिक वापर १६१ दलघमी दाखविला आहे(संदर्भ पृष्ठ ११, गोदावरी अभ्यास गटाचा अहवाल,२०१३) समांतर पाणीपुरवठा योजना, स्मार्ट सिटी, डीएमआयसी आदीकरिता आरक्षित पाण्याबद्दल फेर नियोजन २०१८ मध्ये उल्लेख करण्यात आलेला नाही

(१) सिंचन अनुशेष निर्मूलन सिंचन घोटाळ्यासंदर्भात दिनांक २९ नोव्हेंबर २०१२ रोजी प्रसिद्ध श्वेतपत्रिकेत शासनाने जाहीर करून टाकले आहे की गोदावरी खोऱ्याअंतर्गत मराठवाडा भागाकरिता(जी १ ते जी ५) नवीन प्रकल्पांसाठी पाणी उपलब्ध नाही आणि सन २००२- ०३ सन २०११-१२ या दहा वर्षात वैधानिक विकास मंडळावर राज्यात एकूण ४६,९६५ कोटींचा खर्च करण्यात आला त्यापैकी मराठवाड्यावर अंदाजे २० टक्के म्हणजे ९,४५३ कोटी रुपये खर्च झाले

(२) यातून मराठवाडा भौतिक अनुशेष १०० टक्के दूर झाला महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २०१७-१८ च्या वार्षिक अहवालात मात्र अनुशेषासंदर्भात माहिती देताना नमूद करण्यात आले की निर्देशांक व अनुशेष समितीने १ एप्रिल १९९४ रोजीच्या राज्याच्या सिंचन क्षेत्रातील जिल्हा निहाय अनुशेष हा भौतिक अनुशेष(निर्मित सिंचन क्षमता) आणि आर्थिक अनुशेष( अनुषंगिक वित्तीय तरतूद) या आधारावर निर्धारित केला

(३) त्यावेळी आर्थिक अनुशेष ७४१८ कोटी होता त्यानंतर सन २००० मध्ये तो समायोजित करून ६६१८.३८ कोटी असा पुनपरिगणित करण्यात आला सन २००१ पासून राज्यपाल यांनी दिलेल्या निर्देशांचा परिणाम म्हणून मार्च २०११ पर्यंत राज्यातील सर्व जिल्ह्यातील आर्थिक अनुशेष दूर झाला तथापि चलनवाढ बांधकामाच्या कालावधीत झालेली वाढ आदी कारणांमुळे भौतिक अनुशेष दूर करण्यात अपेक्षेप्रमाणे यश आले नाही.

मूळ प्रकल्प अहवालानुसार मुकणे,वाकी,भाम व भावली या धरणांतील एकूण सर्व पाणी गोदावरी नदीद्वारे मधमेश्वर कालव्यावरील सिंचनासाठी वापरणे अभिप्रेत असताना नाशिक भागातील बिगर सिंचनासाठी प्रकल्पात एकूण ४२ टक्के आरक्षण करण्यात आले.-कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काचे २३.६६ टीएमसी पाणी त्वरित द्यावे. कृष्णा-मराठवाडा सिंचन योजना ही कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजनेवर अवलंबून आहे -पण,आता कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजनेला कृष्णा पाणी तंटा निवाडा लवादाची अनुमती नसल्यामुळे कृष्णा-मराठवाडा सिंचन योजनेबद्दल शंका निर्माण झाली आहे.त्यामुळे कृष्णा-मराठवाडा सिंचन योजना आणि एकुनच कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी याचा तातडीने पुनर्विचार होणे आवश्यक आहे अशाप्रकारे वरील तांत्रिक विश्लेषणात्मक मराठवाड्यातील जाणकार व जलतज्ञांचे देखील मत आहे राज्यात आजघडीला मराठवाड्याची ओळख टँकरवाडा व दुष्काळवाडा म्हणून नावारूपास येत आहे मराठवाड्याच्या भौगोलिक सिंचन अनुशेष ४.८२ लक्ष हेक्टर क्षेत्रावर पोचला आहे मराठवाड्याच्या आर्थिक सिंचन अनुशेष सुमारे ४० हजार कोटी रुपयांचा आहे यामुळे मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र वाढत आहे महसूल विभागाचा दावा आहे की मराठवाडयात एका दिवसात तीन शेतकरी आत्महत्या करत आहेत हि अतिशय खेदाची व दुर्दैवी चिंताजनक बाब आहे राज्यसरकारने तातडीने पावले उचलने आवश्यक आहे मराठवाड्यातील परिस्थिती अत्यंत भीषण होत असताना यातच शेतकरी कुटुंबातील व प्रतिकूल परिस्थितीतून आलेले मराठवाड्याच्या प्रादेशिक प्रश्नांची जाण असणारे मराठवाड्याचा सिंचन अनुशेष पाण्याची तुट शेतकरी आत्महत्या बेरोजगारी भूमिहीन बेरोजगार मजुरांचे स्थलांतर उद्योगांचा अनुशेष पर्यटनाचा अनुशेष शिक्षणाचा अनुशेष आरोग्याचा अनुशेष यात प्रामुख्याने मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी व शेतकरी आत्महत्या होऊ नये यासाठी सिंचन अभ्यासक मराठवाडा पाणी प्रश्न नितीन पाटील खोडेगावकर हे पोटतिडकीने मराठवाडा ही आपली प्रादेशिक व सांस्कृतिक अस्मिता असून मराठवाड्याच्या या सर्व प्रादेशिक प्रश्नांवर पोटतिडकीने अविरत संघर्ष करणारे चळवळीतील व्यक्तिमत्व म्हणून आज मराठवाड्यातच नव्हे तर राज्यभरात सिंचन अभ्यासक मराठवाडा पाणी प्रश्न नितीन पाटील खोडेगावकर यांच्याकडे पाहिले जात आहे

# बदामराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालयात फळ वाटप

## शिवसेना भवनात रक्तदान शिबिर


गेवराई ।प्रतिनिधी

पहलगाम मध्ये आतंकवाद्यांनी हल्ला करून निष्पाप भारतीयांची हत्या केल्याने यावर्षी आपण वाढदिवस साजरा करणार नाहीत असे शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी जाहीर केले होते. मात्र ३ मे रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसैनिक आणि कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबिर, रुग्णांना फळ वाटप, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप आदी विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला.

शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा तीन मे रोजी वाढदिवस असतो मात्र यावर्षी पहेलगाम येथे आतंकवाद्यांनी हल्ला करून निष्पाप भारतीयांची हत्या केल्याने देशभरात दुःखद वातावरण आहे. त्यामुळे यावर्षी आपण वाढदिवस साजरा करणार नाहीत असे बदामराव पंडित यांनी जाहीर केले होते. या पार्श्वभूमीवर त्यांनी कोणाचेही शाल श्रीफळ पुष्पहार काही स्वीकारले नाही. मात्र शिवसैनिक आणि कार्यकर्त्यांनी तालुक्यात विविध ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप वृक्षारोपण



केले तर गेवराईच्या उपजिल्हा रुग्णालयात युवानेते रोहित पंडित यांच्यासह उपसरपंच विलास शिंदे, रामराव मोहिते, नागेश धट, चंद्रसेन जाधव, फैसल मामू चाऊस, नवीद राज, फिरोज पटेल, दत्ता राठोड, अमोल सुतार, शेख नवीद आदींच्या हस्ते रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. शहरातील शिवसेना भवन येथे साद चाऊस आणि उज्वल सुतार यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात युवानेते रोहित पंडित यांच्यासह अनेक तरुणांनी गरजवंत रुग्णांसाठी रक्तदान करून बदामराव पंडित यांचा वाढदिवस साजरा केला.






# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शाखा नांदेडच्या नियुक्त्या जाहीर

## कार्याध्यक्षपदी रामेश्वर काकडे तर जिल्हा सरचिटणीस पदी बापूसाहेब पाटील

**प्रतिनिधी @ नांदेड**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा नांदेड अंतर्गत जिल्हा कार्याध्यक्षपदी सकाळचे जिल्हा प्रतिनिधी रामेश्वर काकडे तर सरचिटणीस पदी मराठी अपडेटचे संपादक बापूसाहेब पाटील यांची सर्वानुमते निवड जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी इतरही पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संघटक संजय भोकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, राज्य समन्वयक नितीन शिंदे यांच्या आदेशान्वये तर प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे यांच्या सूचनेवरून नांदेड जिल्हाची उर्वरित कार्यकारणी हॉटेल विसावा येथे घेतलेल्या बैठकीत सर्वानुमते निश्चित करून जाहीर करण्यात आली.यामध्ये प्रामुख्याने पत्रकार संघाच्या नांदेड जिल्हा कार्याध्यक्षपदी दैनिक सकाळचे जिल्हा प्रतिनिधी रामेश्वर काकडे तर सरचिटणीस पदे मराठी अपडेटचे संपादक बापूसाहेब पाटील यांची निवड निश्चित करण्यात आली. या निवडीसह जिल्हा उपाध्यक्षपदी दैनिक सत्य मराठीचे संपादक आयुब पठाण, महानगर सचिवपदी सकाळचे गौरव वाळंबे यांची निवड करण्यात आली.सदरील निवडीचे नियुक्तीपत्र जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे आणि लक्ष्मीकांत मुळे यांच्यासह जिल्हा पदाधिकारी यांच्या शुभ हस्ते देण्यात आले.

### वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री अजितदादांच्या बीड जिल्ह्यात

# ११५ दिवसात ९० शेतकऱ्यांच्या आत्महत्या !

**प्रतिनिधी @ बीड**

अतिवृष्टीमुळे ,नापिकी कर्ज आधी विविध कारणामुळे बीड जिल्ह्यात अनेक वर्षांपासून शेतकरी आत्महत्यांच्या घटना सातत्याने घडत आहेत.शेतीचा वाढलेला खर्च, नापिकी, कर्जबाजारीपणा, तसेच अतिवृष्टीमुळे होणारे शेतीपिकांचे नुकसान आदि कारणांमुळे शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत.या आत्महत्या रोखण्यासाठी शासन स्तरावरून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.तरीही शेतकरी आत्महत्यांच्या घटना थांबलेल्या नाहीत. सन २०२५ या नविन वर्षात१ जानेवारी ते २५ एप्रिल २०२५ या दरम्यान ११५ दिवसात जिल्ह्यातील ९० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे .मात्र यातील एकही आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या वारसांना शासकीय मदत मिळालेली नाही.

राज्याचे उपमुख्यमंत्री वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजित दादा पवार यांच्या जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या नंतर शासकीय योजनांची व्यवस्थित अंमलबजावणी न केल्याने त्यांच्या कुटुंबीयांची आणखी परवडत होत असून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला सरकारकडून मिळणारे एक लाख रुपये मदत वेळेवर दिली जात नाही. बीड जिल्ह्यात गेल्या ०४ महिन्यात ९९ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. यातील ५८ प्रकरणे अद्यापही चौकशीसाठी प्रलंबित आहेत तर चौकशीनंतर २७ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरलेली आहेत परंतु अद्याप त्यांना



सरकारची मदत मिळाली नाही. त्यामुळे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या साठी हि लाजिरवाणी बाब असुन तातडीने मदत देण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.५ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांचे आदेश पायदळी - डॉ.गणेश ढवळे

शेतकरी आत्महत्या प्रकरणातील मदत वेळेत संबंधित आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मिळाली पाहिजे. तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय यंत्रणेकडून आवश्यक अहवाल घेऊन चौकशी प्रलंबित प्रकरणे प्राधान्याने १ महिन्याच्या आत मार्गी लावावीत अशा सूचना मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी विभागीय आयुक्तांना सुचना देत शेतकरी आत्महत्या मदतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आढावा जाहीर केले आहे.मात्र प्रशासन स्तरावरील यंत्रणा ढिसाळ असल्याने याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे आदेश पायदळी तुडवल्याचे दिसून येत आहे.

# पिंपळोद येथे पोषण अभियान आरोग्य संदेशचा कार्यक्रम संपन्न

पिंपळोद ।प्रतिनिधी

नुकताच अंगणवाडी क्र.३ येथे पोषण अभियान अंतर्गत आहार आणि आरोग्य संदेश सी.बी ई. कार्यक्रम आणि बाल रक्षण सभा आयोजित करण्यात आली होती. ज्यात लहान मुलांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी मातांनी काय उपाय करावेत मुलांना काय खायला द्यावे काय नाही,जेणे करून त्यांच्या बुद्धीचा विकास व्हावा, कुठलं ही मुलं कुपोषित राहू नये. या कडे सरकार खूप लक्ष देवून आहे. कारण आताचे लहान बालके देशाचे भवतव्य आहेत, हे बालके सुरक्षित रहावे यासाठी वेगवेगळे शिबिर आरोग्य चाचणी राबवण्यात येत असते, आशा वर्कर पासून ते मोठ मोठे अधिकारी पदाधिकारी सर्व टीम उन्हाळा, पावसाळा ,हिवाळा, बारा महिने ३६५ दिवस आपल्या जीवाची परवा न करता उन्हातानात उपाशी तापाशी जिद्दीने काम करत आहेत हे खूप अभिमानाची गोष्ट आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापिका सौ. सुनिता भुस्कट मॅडम, अंगणवाडी सेविका देवकन्या प्रशांत पातुर्डे, मदतनीस सौ वच्छला प्रभाकर सोळंके, आशा वर्कर सौ दुर्गा मोहन सोळंके, श्री. सागळे सर, गावातील निमंत्रित प्रतिष्ठित महिला यांच्या उपस्थितीत डॉ. भीमराव आंबेडकर, सावित्रीबाई फुले, यांच्या फोटो चे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली होती . सर्व



महिला मंडळी व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत कार्यक्रम आनंदात पार पडला.

# तालुकास्तरीय निबंधस्पर्धेत डॉ. विठ्ठल जाधव प्रथम तर सारिका गाडेकर द्वितीय

**प्रतिनिधी @ शिरूर कासार**

तहसिल कार्यालयाच्या वतीने 'शेतरस्त्याचे वाढते वादविवाद, शेतकऱ्यांच्या प्रगतीतील मोठा अडथळा' या विषयावर तालुकास्तरीय खुली निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत डॉ. विठ्ठल जाधव यांना प्रथम क्रमांकाचे पाच हजार रूपयांचे बक्षीस तहसीलदार सुरेश घोळवे यांचे हस्ते गुरूवार दि.१ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमप्रसंगी प्रदान करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार शिवनाथ खेडकर, ए.बी. गावडे, व्ही.एस. इंगळे, पोलिस निरीक्षक गणेश धोक्रट यांची प्रमुख उपस्थिती होती.

शेत शिवारात बांध, रस्ते यावरून वाद होतात. समाजातील सलोखा कायम रहावा. शेतकऱ्यांच्या प्रगतीतील अडथळा दूर होण्यासाठी समाज प्रबोधन, बौद्धिक विचारमंथन आणि जागृती उद्देशाने तालुकास्तरीय खुली निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. एकूण सत्तर निबंध प्राप्त झाले. त्यात साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव सर्वप्रथम आले तर सारिका गाडेकर, शिरूरकासार (द्वितीय) शिवराम राऊत, हिवरसिंगा (तृतीय), सुवर्णा ढाकणे, मलकाची वाडी (चतुर्थ), मंगल परदेशी, खोकरमोहा (पाचवा)



यांनी क्रमांक मिळविले. त्यांना पाच, चार, तीन हजार असे रोख बक्षीस आणि प्रमाणपत्र देऊन महाराष्ट्र दिनी गौरविण्यात आले. नायब तहसीलदार व्ही.एस. इंगळे यांनी सुत्रसंचलन केले. या यशाबद्दल महारूद्र डोंगरे, संजय फरतडे, विष्णू शिंदे, संतोष कोकाटे, प्रशांत आगलावे, जमीर शेख यांनी डॉ. जाधव यांचे स्वागत केले.

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची सिवेज ट्रीटमेंट प्लांट कांचनवाडीला भेट

**प्रतिनिधी @ बीड**

आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थांना सिवेज ट्रीटमेंट प्लांट कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर येथे शैक्षणिक भेट दिली. यावेळी जलजन्य रोगांचा प्रसार रोखून सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यात एसटीपीची काय भूमिका आहे. प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे समुदाय आणि परिसंस्थांवर काय परिणाम होतात. हे विद्यार्थी समजून घेतले. पाण्याची गुणवत्ता व्यवस्थापन आणि प्रक्रिया या बद्दल विद्यार्थ्यांनी सविस्तर माहिती घेतली.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा, आदित्य पॉलिटेक्निक चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महाविद्यालयाचे पी. डी. दुधाळ, जी. एम. खालापुरीकार, ए.आर. मुंडे, आर.एस. वरपे यांची उपस्थिती होती.

पर्यावरण विज्ञान, स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यास करणारे विद्यार्थी वर्गात शिकलेल्या सैद्धांतिक संकल्पनांचा व्यावहारिक उपयोग प्रत्यक्षपणे पाहण्यासाठी असा शैक्षणिक अभ्यास भेटीचे आयोजन केले जाते.

परिक्षेत्र भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होते

महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान दिले



जाते. आपण जे शिकलो आहोत. ते जर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समोर दिसले अनुभवता आले. प्रत्यक्ष कृतीतून शिकता आले तर त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होते. सिवेज ट्रीटमेंट प्लांटला विद्यार्थ्यांनी दिलेल्या भेटीमुळे पाण्याची गुणवत्ता व्यवस्थापन प्रक्रिया त्यांना पूर्ण पणे समजली. निरीक्षण केल्याने विद्यार्थ्यांना खाम नदी सारख्या जलसाठ्यात सोडण्यापूर्वी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी केलेल्या प्रक्रियेची संपूर्ण माहिती मिळाली. ही माहिती त्यांना भविष्यात उपयुक्त ठरणार आहे.

-डॉ. राहुल खडके, प्राचार्य आदित्य पॉलीटेकनिक, बीड

# लातूर शहराला स्वच्छ पाणी पुरवठ्यासाठी तातडीने उपाययोजना- पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले



हरंगुळ येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी

लातूर ।प्रतिनिधी

लातूर शहरातील पाणी पुरवठा योजनेच्या नळांना गेल्या काही दिवसांपासून पिवळ्या रंगाचे पाणी येत आहे. यावर तातडीने उपाययोजना करून शहराला स्वच्छ पाणी पुरवठा करण्याच्या सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गुरुवारी दिल्या. लातूर महानगरपालिकेच्या हरंगुळ येथील जलशुद्धीकरण केंद्राची त्यांनी पाहणी केली. स्वच्छ पाणी पुरवठ्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन त्यादृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, लातूर महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त देविदास जाधव, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंता तथा प्रशासक रुपाली ठोंबरे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, लातूर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता अमरसिंह पाटील आणि पाणी पुरवठा अभियंता विजय चव्हाण यावेळी उपस्थित होते

# स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांची सात दिवस श्रीमद भागवत कथा

**प्रतिनिधी @ नेकनुर**

वारकरी सांप्रदायाचे भक्ती सूर्य स्वानंद सुखनिवासी जोग महाराज यांचे पट्ट शिष्य महान संत श्रीगुरु वै.बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी महोत्सवा निमित्त श्री क्षेत्र नेकनूर येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे . दि ६ मे २०२५ वार मंगळवार ते दिनांक १३ मे २०२५ वार मंगळावर या आठ दिवसाच्या कालावधीमध्ये भव्य ज्ञानयज्ञ संपन्न होणार आहे. यात २४ तास अखंड अन्नदान आणि ज्ञानदान सोहळा होणार आहे.. याचा सर्व भाविक भक्तानी लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

यात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भागवत कथाकार प पू भास्करगिरी महाराज देवगडकर यांचे उत्तराधिकारी श्री ह भ प स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांची सात दिवस भागवत कथा होणार आहे . तसेच महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकारांचे कीर्तने होणार आहेत .या सर्व कार्यक्रमाचा

## आठ दिवस बंकटस्वामी महाराज संस्थान करणार गरजू मुलींचे कन्यादान

भावीक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती बंकटस्वामी मठ नेकनुर , पंढरपूर , आळंदी,विश्वस्त ,अन्नदान कमिटी ,गावकरी मंडळी नेकनुरकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात दि- ६ मे पासून सुरुवात होणार आहे यात आठ दिवस कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे.यात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध श्री ह भ प स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांचे सूश्राव्य भागवत कथा होणार आहे.तसेच महाराष्ट्रातिल नांमाकित कीर्तनारांची किर्तने व संगीत भजन,प्रवचन आदि कार्यक्रम होनार आहेत . दिनांक ६ मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता बंकटस्वामींच्या पालखीची नेकनूर येथिल बंकटस्वामी शिक्षक कॉलनी येथून भव्य शोभा यात्रा निघणार आहे.

सप्ताहात बंकटस्वामी संस्थान करणार मुलींचे कन्यादान

बंकटस्वामी संस्थांच्या वतीने यावर्षी विवाह सोहळा आयोजित करण्यात येणार आहे, सप्ताहाच्या आठ दिवसाच्या कालावधीत बंकटस्वामी संस्थान लग्नाचा खर्च उचलून संसार उपयोगी साहित्य देऊन कन्यादान करणार असल्याने परिसरातील इच्छुक वर वधू पित्यांनी याचा लाभ घेऊन आपल्या मुला मुलींचे विवाह सप्ताहात करण्याचे आवाहन ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे विश्वस्त व अन्नदान कमिटी, ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नामदेव महाराज शास्त्री यांचे बडेवाडीत बुधवारी आशिर्वचन

दिंद्रुड ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील बडेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाला बुधवारी सुरूवात होत आहे.या निमित्त श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत डॉ. न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांच्या आशीर्वचन कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी सायंकाळी करण्यात आले आहे.

बडेवाडी येथे मागील काही वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताह तथा ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण,श्रीमद भागवत कथा व किर्तन महोत्सवाचे आयोजन वैशाख महिन्यात करण्यात येते. या धार्मिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत ह.भ.प.डॉ. नामदेव



महाराज शास्त्री बुधवारी अखंड हरिनाम सप्ताह निमित्त बडेवाडी आशीर्वचन कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत,नित्रुड येथून डॉ.नामदेव शास्त्री यांची मिरवणूक होणार आहे. भाविक भक्तांची सायंकाळी ४ वाजता पायी पदयात्रा टाळ मृदंगाच्या निनादात काढण्यात येईल. सायंकाळी ६ वाजे दरम्यान बडेवाडी येथे भाविक भक्तांना डॉ.नामदेव महाराज शास्त्री आशीर्वचन देतील. या कार्यक्रमानंतर रात्रौ ९ वाजता विनोदाचार्य प्रकाश महाराज साठे यांचे कीर्तन संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन श्री संत भगवान बाबा तरुण मित्र मंडळ व समस्त गावकरी मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.